।। श्री गजानन प्रसन्न ।।

# लोकमार्ग

।। श्री सत्पुरुष प्रसन्न ।।

RNI No. MAHMAR/2013/54958

वर्ष : पाचवे । अंक : ४२ । मुंबई, ठाणे, कोकण येथून प्रकाशित होणारे साप्ताहिक । मंगळवार २६ फेब्रुवारी ते सोमवार ४ मार्च २०१९ । पृष्ठ : १२ । मूल्य : २/- रुपये

## एसआरए योजनांमध्ये बाहेरच्यांची घुसखोरी

**मुंबई / प्रतिनिधी**

संपूर्ण मुंबईतल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचीच पुनर्रचना करण्याची वेळ आली आहे. कारण या योजनेत सत्तर टक्क्यापेक्षा जास्त लोक मूळ प्रकल्पाबाहेरचे असून स्वस्तात मिळणाऱ्या या घरांसाठी या योजनेचा गैरवापर होत असल्याचे दिसून आले आहे. म्हणूनच एसआरएतली घुसखोरी रोखण्याचे नवे उपाय सरकार अंमलात आणणार आहे.

अलिकडेच केलेल्या एका सर्वेक्षणात काही महत्त्वाच्या आणि मोठ्या योजनांमध्ये सत्तर हजारापेक्षा जास्त रहिवासी हे प्रकल्पाबाहेरचे असल्याचे आढळून आहे. एसआरए योजनेच्या नियमाप्रमाणे त्या झोपडीत राहणाऱ्या कुटुंबातल्या एकाच व्यक्तीला घर उपलब्ध होऊ शकते; परंतु अनेक ठिकाणी एकाच कुटुंबातील अनेक जण फायदा घेतातच. शिवाय बिल्डर लोक काही बनावट कागदपत्रे तयार करून बाहेरच्या लोकांना या योजनेत घरखरेदी करण्याची संधी देतात. किंबहुना बिल्डर आणि काही गुंतवणुकदार यांच्या हितसंबंधातून एकूण योजनेच्या 30 टक्के फ्लॅटस बाहेरचे लोक हडप करीत असल्याचे दिसनू येते.

मुलुंड पूर्व, पश्चिम, तसेच भांडूप, विक्रोळी, घाटकोपर या सर्व उपनगरातील एसआरए योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रकल्पाबाहेरील लोकांनी घुसखोरी केल्याचे समोर आले आहे. मुलुंड पूर्व आणि पश्चिमेच्या सात एसआरए योजनांबाबतही ही बाब उघड झाली असून अशा बाहेरच्या लोकांवर काय कारवाई करता येईल आणि यापुढे एसआरए योजनेचा गैरफायदा गुंतवणूकदार उठवणार नाहीत, असे नवे नियम करण्याचा विचार सरकारने सुरू केला आहे.



**बिल्डरांना झोपडपट्ट्यांच्या जागा अक्षरशः फुकटामध्ये मिळत असल्याने हे प्रकल्प आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी ते सर्व प्रकारच्या मार्गाचा अवलंब करतात. म्हणूनच यापूर्वी या योजनेचे प्रमुख असलेल्या अधिकाऱ्यांनी आपल्या निवृत्तीच्या एक दिवस आधी चारशे फायलींचा निपटारा करून विक्रम नोंदवला होता. त्याची आता चौकशीही सुरू आहे; परंतु सरकारी स्तरावरच बिल्डरांना फायदा करून देणारी एसआरए योजना सामान्य झोपडीधारकांना मात्र योग्य तो लाभ मिळवून देऊ शकलेली नाही.**



## कोकण किनारपट्टीसह मुंबईत हाय अलर्ट

**मुंबई / प्रतिनिधी**

काल भारताने पुलवामा येथे झालेल्या निर्दयी हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तीन ठिकाणांवर हल्ले केल्याचे जाहीर केले. या पार्श्वभूमीवर देशातल्या पाच मोठ्या नगरांना अतिदक्षतेचा इशारा दिला आहे. त्यातही मुंबई महानगराची सुरक्षा व्यवस्था मोठ्या प्रमाणावर वाढविली गेली आहे. आणि संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर नौदल आणि तटरक्षक दलाला मोठ्या संख्येने तैनात केले गेले आहे.

पुलवामानंतर दहशतवादाला सतत पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानमध्ये या हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्याविषयी जोरदार चर्चा सुरू झाली. दहशतवादाचा पुरस्कार करणाऱ्या पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवर एकटं पाडण्याचे भारताचे प्रयत्न एकीकडे सुरू आहेतच. त्याचप्रमाणे या दहशतवाद्यांच्या पाकिस्तान आणि भारताच्या सीमेलगत असलेल्या किल्ल्यांचा धुव्वा उडविण्याची आपली लष्करी ताकद भारताने काल सिद्ध केली. त्यामुळे आता आपल्या मर्यादा लक्षात घेऊनच पाकिस्तानला प्रतिकार करावा **(पान ५ वर)**



## मुंबईतील बालमृत्यूंमध्ये वाढते प्रमाण

**मुंबई / प्रतिनिधी**

मुंबईसारख्या आधुनिक नगरात बालमृत्यूंमध्ये धक्कादायक वाढ झाल्याचे दिसते. गेल्या वर्षभरात सायनच्या टिळक रुग्णालयात ५ हजार ८७६ मुलांना दाखल केले गेले. त्यापैकी १७१ मुलांचा मृत्यू झाला. ही संख्या अतिशय चिंताजनक ठरते. २०१४ ते २०१८ या चार वर्षातली आकडेवारी बघितली तर परिस्थिती आणखीनच भयानक असल्याचे दिसते. या सर्व कालावधीत १५ हजार ४७५ छोट्या बाळांना दाखल केले गेले. आणि त्यातल्या तब्बल १५०० मुलांचा मृत्यू झाल्याचे याच रुग्णालयाची आकडेवारी सांगते.

मुंबईसारख्या महानगरात आरोग्यविषयक सर्व आधुनिक सुविधा असताना हे बालमृत्यू होत असतील तर मग आरोग्य व्यवस्थेतच मोठा दोष असल्याचे म्हणावे लागेल.

डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांमुळे या मुलांचे मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. सायन रुग्णालयामध्ये सर्वाधिक मुलं दाखल होत असतात. बाल रुग्णांची ही संख्या लक्षात घेऊन आणि त्यातल्या मृत्यूचे प्रमाण पाहून महापालिका आणि राज्य शासनाने अधिक चांगली आरोग्य सुविधा तिथे **(पान १० वर)**

# संपादकीय

## आपल्याच संरक्षण धोरणावर प्रश्नचिन्ह

काशिमरमध्ये झालेल्या आत्मघातकी हल्ल्याने भारतापुढे काही गंभीर प्रश्न उभे केले आहेत. या हल्ल्याचा प्रतिकार करत असताना केवळ तात्पुरत्या गोष्टींचा विचार करून चालणार नाही. किंवा केवळ बदल्याची भावना मनामध्ये ठेवून केलेले उपायदेखील परिणामकारक ठरणार नाहीत. ही गोष्ट खरी आहे की काश्मिरमधला दहशतवाद हा पाकिस्तानपुरस्कृत आहे. परंतु तो पाकिस्तान पुरस्कृत कशामुळे झाला याचाही विचार केला पाहिजे. कारण पाकिस्तानला अशा प्रकारची संधी आपणच उपलब्ध करून दिली म्हणजेच काश्मिरमध्ये ज्या ज्यावेळी दहशतीचे प्रयत्न झाले. किंवा अतिरेक्यांनी काश्मिरला वेठीला धरण्याचे ज्या ज्यावेळी प्रयत्न केले त्या त्यावेळी ते इतक्या कठोरतेने मोडून काढले गेले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. आणि आज हाताबाहेर गेलेली काश्मिरची परिस्थिती त्याच निष्काळजीपणाचा परिणाम ठरते. म्हणून काश्मिरला दहशतवादापासून मुक्त करायचे असेल तर काश्मिर खोऱ्यातला भारतीयपणा वाढवावा लागेल. म्हणजेच पुढे काही वर्षांची योजना आखून तिथे हिंसाचार घडवणाऱ्यांचा बंदोबस्त करावा लागेल. जवळपास 1947 पासून काश्मिरमधल्या फुटीरतावाद्यांना संरक्षण देण्याचा पध्दतशीर प्रयत्न झाला. यापूर्वीच्या सरकारांनी या फुटीरतावाद्यांना अशी काही वागणुक दिली की जणुकाही काश्मिर समस्येचा प्रभावी उपाय फक्त या फुटीरतावाद्यांकडेच आहे. असे त्याचे चित्र निर्माण केले गेले. आणि त्यांना अतिमहत्व देण्याच्या सरकारी प्रवृत्तीचा पुरेपूर गैरफायदा या फुटीरतावाद्यांनी घेतला. त्यांनी केवळ स्वत:चे महत्व वाढवले असे नाही तर काश्मिरचे भवितव्य हे पाकिस्तानच्याच हातात आहे. अशी परिस्थिती निर्माण करण्यामध्ये ते यशस्वी झाले. आजची ही गंभीर परिस्थिती भारताने दाखवलेल्या बोटचेपेपणाचा परिणाम ठरते. भारताकडे इतके मोठे लष्कर असूनही मुठभर अतिरेकी भारताच्या नाकात दम आणत असतील तर एकूणच आपल्या देशाच्या संरक्षण धोरणाचा तो पराभव ठरतो. आपण अनेकवेळेला स्वत:ची अमेरिका, इंग्लंड, रशिया या देशांशी तुलना करतो परंतु त्यांची संरक्षणाची योजना किती भक्कम आहे. हे लक्षात घ्यायला मात्र विसरतो. स्वत:च्या देशाचे संरक्षण करीत असतानाच अफगाणस्तिान, इराक, या देशात जाऊन तिथल्या हुकुमशहांना हद्दपार करण्यात हीच अमेरिका यशस्वी होते.

**निकम्मेपणाचे प्रदर्शन**

दुर्दैव असे आहे की भारताला गेली पन्नास वर्षे काश्मिरचा विषय संपवता आलेला नाही. कोणतेही कारण नसताना काश्मिर समस्येचे राजकीयकरण केले जाते. तिला जाणीवपूर्वक समस्या ठरवले जाते. आणि त्यावर केवळ राजकीय तोडगा निघू शकतो. असे वारंवार भासवले जाते. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. काश्मिर हा भारताचा अविभाज्य अंग आहे. असे केवळ ठराव केले गेले. पण ठरवून काश्मिरचे प्रश्न हातावेगळे झाले नाहीत. एकीकडे काश्मिरविषयक ठराव पारीत होत असतानाच काश्मिरी पंडितांना मात्र तिथून योजनापूर्वक हुसकावले गेले. तरीदेखील या पंडितांच्या पुनर्वसनाचे कोणतेही ठोस प्रयत्न झाले नाहीत. उलट त्यांना हुसकावून लावले गेले. आणि आता तिथून लष्कराला हुसकावून लावण्याचे तितकेच आक्रमक प्रयत्न पाकिस्तान दहशतवाद्यांना हाताशी धरून करीत आहे. भारताने ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. कोणत्याही मार्गाचे अवलंब करून काश्मिरला दिली जाणारी वेगळी वागणुक थांबवली पाहिजे. सिर्जकल स्ट्राईक करून पाकिस्तानातली दहशतवादी केंद्रे उध्वस्त करण्यापूर्वी दहशतवाद्यांचा खातमा केला पाहिजे. या हल्ल्यानंतर अधिक आक्रमकपणे काश्मिरमध्ये लष्करी कारवाई राबवायला हवी. आणि गुप्तचर यंत्रणा अधिक कार्यक्षम करून पाकिस्तानी मदत घेणाऱ्या दहशतवाद्यांचे तोंड कायमचे पोळून टाकले पाहिजे. त्यावेळेला त्यांना असे समजेल की आपण घेत असलेली पाकिस्तानची मदत म्हणजे आपल्या विनाशाची दावत आहे. इतका जबरदस्त धाक त्यांच्यावर निर्माण झाला पाहिजे. या हल्ल्यामुळे आपली गुप्तचर यंत्रणा प्रभावी नाही. हे पुन्हा एकदा सिध्द झाले. ती जागतिक दर्जाची झाली पाहिजे तरच दहशतवाद्यांचा बिमोड होईल. ईसीस नावाच्या ज्या संघटनेची सध्या जगभर चर्चा आहे त्याच्यापेक्षाही जास्त हिंसाचार काश्मिरमधल्या दहशतवाद्यांनी चालवल्याचे दिसते. जी काही उपाययोजना केली जाईल. ती भारताचे नुकसान करणारी ठरू नये. आणि कायम स्वरु पी असली पाहिजे. कारण आता सहनशिलतेच्या मर्यादा संपलेल्या आहेत. नेहमीप्रमाणे आपण पाकिस्तानविरु ध्द आरोप करीतच असतो. परंतु वारंवार अरोप करून आपण आपल्या निकम्मेपणाचे प्रदर्शन करतो. ज्याची या मुळे जागतिक पातळीवरसुध्दा दखल घेतली जाते. त्यातून भारताचा कमजोरपणाच सिध्द होत राहातो. हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे.




## जाणतेपणाची लक्षणे



**समर्थ** रामदासांनी आपल्या मनाच्या श्लोकामध्ये केलेल्या एका श्लोकाचा अर्थ हा मनाच्याऐवजी जनासाठी म्हणजेच देशातील जनतेसाठीसुध्दा जसाच्या तसा लागू होऊ शकतो. समर्थांची क्षमा मागून असे म्हणता येईल,

*जना रे मनी मौन्य मुद्रा धरावी।*
*कथा आदरे शिवबाची करावी।*

समर्थांनी मनाला बोध केला परंतु त्याच समर्थांनी प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनाही बोध केला होता. आणि त्यांचे श्रीमंत योगी असे वर्णन करून मुघल सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी आग्रहही केला होता. याच शिवाजी महाराजांना त्यांनी जाणता राजा असे यथार्थ विशेषण लावून त्यांच्या कर्तृत्वाचा आणि नेतृत्वाचा गौरवही केला होता. आज तारखेप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे. शासकीय स्तरावर तारखेने जयंतीसाजरी होते. तर अनेक ठिकाणी अनेक संघटना तिथीप्रमाणे महाराजांच्या कर्तृत्वाला अभिवादन करीत असतात. आज तीनशे साडेतीनशे वर्षानंतरही महाराजांच्या या कर्तृत्वाचे पोवाडे इतिहास गातो आहे. आणि पुढची अनेक शतके तो असाच गात राहाणार आहे. किंबहुना आज देशाची किंवा समाजाची ही परिस्थिती आहे. ती पाहिल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अवतार या महाराष्ट्र भूमीवर झाला म्हणून या देशाला विजयी इतिहास पाहायला मिळाला. जर महाराज नसते तर आज देशाची अवस्था ही इस्लामी राष्ट्र म्हणूनच झाली असती. महाराजांनी सर्वशक्तीनिशी साडेतीनशे वर्षापूर्वी केलेला शौर्याचा शंखनाद आजही वातावरणामध्ये दुमदुमत असतो. किंबहुना त्यांच्या या युध्दीनीतीनेच देश , संस्कृती, धर्म टिकून राहू शकतो अशी चिरंतन टिकणारे संचित आपल्याला बहाल केले. केवळ स्वत:च्या एकट्याच्या युध्द आणि राजनीतीच्या जोरावर त्यांनी दिल्लीचाही तख्त गाजवणाऱ्या औरंगजेबापासून ते आदिलशहापर्यंत अनेकांना सळो की पळो करून सोडले. या शौर्याची परिसीमा म्हणजेच त्यांनी जिंकलेले दिडशे किल्ले आहेत. जे आजही त्याच विजयाची शौर्याची आणि स्वाभिमानाची मानिसकता बदलून त्याच्यासमोर विजयाचा साक्षात्कार घडवण्याचे आव्हान महाराजांनी यशस्वी करून दाखवले. त्यांच्या जयंतीनिमित्ताने याच कर्तृत्वाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये त्याचे संक्रमण झाले पाहिजे.

**आजच्या पिढीसाठी शौर्य**

महाराजांनी दिलेला हा विजयाचा किंवा शौर्याचा वसा टिकवून ठेवण्याची जबाबदारी आताच्या समाजाची आहे. संपूर्ण महाराष्ट्र मुघलीसत्तेच्या अंमलाखाली होता. पूर्वीच्या मोठमोठ्या राजांनीसुध्दा मुघलांचे मांडलिकत्व स्वीकारुन गुलामीचे प्रदर्शन मांडले होते. अशा परिस्थितीत यवनांची सत्ता उलथवणे आणि स्वजनांची मानिसकता बदलवणे अशा दोन्ही आघाड्यांवर महाराजांना कार्य करावे लागले. त्यासाठी स्वत:च्या जीनव व्यवहारातून आदर्श घालून द्यावे लागले. आपल्या राजाचा त्याग शौर्य , स्वाभिमान आणि त्याच पध्दतीचे स्वजनांवरचे प्रेम पाहून त्यावेळच्या मावळ्यांनी शिवाजी महाराजांसाठी आपलेही सर्वस्व देऊ केले होते. हिंदवी स्वराज्य अशी लोकविलक्षण संकल्पना मांडून लोकांच्या मनातून लोप पावत चाललेल्या धर्माचे स्फुल्लिंग त्यांनी चेतवले. आणि आक्रमकांपुढे त्याच ताकदीच्या शौर्याचे जबरदस्त आव्हान उभे केले. म्हणूनच महाराजांची राजनीती आणि युध्दनीती ही अभूतपूर्व स्वरुपाची ठरली ज्याचा जगातल्या मोठमोठ्या इतिहासकारांनी अभ्यास केला. मर्यादित साधनसामुग्रीमध्ये त्यांनी संपादन केलेल्या या यशाची जगाला दखल घ्यावी लागली. म्हणूनच आजही मोठमोठ्या विद्यापीठांमध्ये शिवाजी महाराज एकव्यक्ती म्हणून जसा अभ्यासाचा विषय ठरतो तसाच तो एक विचार म्हणूनही अभ्यासला जातो. ज्यामधून युध्द कौशल्याची आणि राज्यकारभाराची उदाहरणे सापडतात. आजची देशभरातली परिस्थिती पाहिल्यानंतर महाराजांच्या या कर्तृत्वाचा नीट अभ्यास केला तर कोणत्याही शत्रूची भारताकडे वाकड्या नजरेने पाहाण्याची हिंमत होणार नाही. दुर्दैवाने तशी प्रवृत्ती दिसत नाही. केवळ देशाभिमान दाखवून विजय मिळवता येतो. अशी चुकीची समजूत करून घेतली गेली. परंतु स्वाभिमानाबरोबर युध्दनीतीमध्ये उपयोगी पडणारे शौर्य आणि शत्रूला नामोहरम करणारा गनिमी कावा तितकाच महत्वाचा ठरतो. सर्व प्रकारच्या आधुनिक सोयीसुविधा किंवा तंत्रज्ञान उपलब्ध असूनही दहशतवादासारख्या संकटाने देशाला भंडावून सोडावे हे आश्चर्यकारक ठरते. ज्या काळात महाराजांकडे कोणत्याहीसुविधा नव्हत्या पण त्यांनी याच मुघलांचा दहशतवाद मोडून काढला होता. आजही जर तोच दहशतवाद नाहीसा करायचा असेल तर पुन्हा एकदा महाराजांनी जोपासलेली युध्दनीती आणि मुत्सद्देगिरी अंमलात आणावी लागेल.


**अफजलखानी दहशतीचा कोथळा**

आजच्या या राष्ट्रीय परिस्थितीचा विचार केला तर इतिहास हा कसा धडे शिकवतो. हे सहजपणे लक्षात येते. काश्मिरमधली आजची परिस्थिती म्हणजे आजच्या राज्यकर्त्यांची फसलेली राजनीती ठरते. त्याचा उपयोग युध्दनीतीच्या मदतीने अधिक चांगल्या पध्दतीने करून घेता येऊ शकतो. महाराजांच्या काळात अशीच अफजलखानी दहशत पसरवली गेली होती. प्रचंड सेना आणि धिप्पाड देह असलेल्या अफजलखानाला महाराजांनी याच युध्दनीती आणि राजनीतीच्या माध्यमातून नाहीसे केले होते. त्या अफजलखानाचा कोथळा बाहेर काढून त्याच्या मनसुब्यांना छिन्नविछिन्न केले होते. दुर्दैव असे आहे की त्याच अफजलखानाची कबर आजही आपण शाबूत ठेवलेली आहे. आणि हीच राजनीतीने युध्दनीतीवर केलेली कुरघोडी ठरते. नव्हे ती सर्वात मोठी घोडचुक ठरते. महाराजांचे प्राण घ्यायला आलेल्या अफजलखानाला नाहीसे केल्यानंतरही त्याची कबर बांधली गेली परंतु आज ती कबर जपण्याचे कोणतेही कारण उरत नाही. त्याकाळात अफजलखान ही जशी देशद्रोही वृत्ती होती. तशीच आजही काश्मिर आणि देशाच्या काही भागात तीच प्रवृत्ती पाहायला मिळते. आक्रमकांच्या या कबरी कधीच उध्वस्त व्हायला हव्या होत्या. परंतुत्या जपल्या गेल्यामुळे भारतात दहशतवादाचा उरून भरवला जातो. अशावेळी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहात असताना त्यांनी आक्र मकांचा कोथळा बाहेर काढण्याचे जे शौर्य दाखवले त्याचेच वारंवार स्मरण झाले पाहिजे.

कोकण वार्ता

# प्राणीमात्रांवरच जगाचे अस्तित्व अवलंबून

" कोल्हापूर कण्हेरी मठाचे स्वामी काडसिध्देश्वर महाराज यांचे प्रतिपादन "



चिपळूण: महोत्सवात बोलताना स्वामी अदृश्य काडसिध्देश्वर महाराज, सोबत दादा इदाते, सुरेखा खेराडे, भगवान कोकरे, शरद बोरकर.

चिपळूण / प्रतिनिधी

काहीही तयार न करणारा माणूस या जगाचा मीच मालक असल्याचे समजतो. मात्र त्याच्या हातात काहीही नसून ज्यादिवशी गायी, मधमाशा व फुलपाखरू या जीवनचक्रातून गायब होतील त्यानंतर फक्त दोनच वर्षात संपूर्ण जगच नष्ट होईल, अशी भीती कोल्हापूर येथील कण्हेरी मठाचे स्वामी अदृश्य काडसिध्देश्वर महाराज यांनी व्यक्त केली. एकंदरीत या सर्व प्राणीमात्रांवरच जगाचे अस्तित्व अवलंबून असल्याचे ते म्हणाले.

येथील पवनतलाव मैदानावर आयोजित विश्वकल्याण महोत्सवाच्या रविवारी झालेल्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. हा महोत्सव ३ मार्च पर्यंत चालणार असून दर दिवशी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. काडसिध्देश्वर महाराज पुढे म्हणाले की, या विश्वाचे चक्र एका साखळीवर चालते. या साखळीत गाय, मधमाशी व फुलपाखरू यांचे महत्व फारच महत्वाचे आहे. पूर्वी घर, भिंती शेणाने सारवल्या जात होत्या. याला गरीब हे कारण नव्हते, तर हे शेण उष्णता रोखत होते. त्यामुळे घरात कायम शांतता नांदत होती. आता जमीन गेली अन् लाद्या आल्या. मात्र तसेच दवाखानेही वाढले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात औषध दुकाने झपाट्याने वाढत असून त्यांचे दिवसाचे उत्पन्न करोडोच्या घरात गेले आहे.

त्यामुळे गाई कमी करून आम्ही आजार विकत आणले आहेत. गाय हटली, अन् औषधे आली, अशी अवस्था झाली असून गाईचे शेण, मूत्र फार औषधी आहे. हे आम्हाला आजही समजलेले नाही. शेण काही दिवस छातीवर लावून ठेवल्यास टीबी, डोक्यावर शेण लावल्यास डोकेदुखी बरी होते. शेण गाळून त्यात मध टाकून ते गरोदर महिलेने प्राशन केल्यास प्रसुती वेदना कमी होऊन ती सहज प्रसुत होते, चांदीच्या पेल्यात ठेवलेले दही गरोदर महिलेने खाल्ल्यास बाळ गोरे गोमटे व सुदृढ होते, गाय व्यायल्यानंतर निघणारे पाणी साठवून ठेऊन ते त्वचेला लावल्यास ती मुलायम होते. गायीची वार वाळवून ठेऊन जखम अथवा आताच्या ज्या ठिकाणी प्लास्टीक सर्जरीची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी बांधून ठेवल्यास अशा सर्जरीची गरजच भासत नाही. घोरणाऱ्यांच्या व नाकाचे हाड वाढलेल्या व्यक्तीच्या नाकात फक्त काही दिवस तूप टाका, कान, नाक दुखत असल्यास तूप घाला. तुमचा आजार काही दिवसांतच नष्ट होतो. गाईचे १ ग्रॅम शेण कुठेही पडल्या त्यापासून ४०० कोटी जीवाणू तयार होतात. हे जीवाणू सृष्टीवर महत्वाचे असतात, असे काडसिध्देश्वर महाराज म्हणाले.

■■■

# ढोलताशा स्पर्धेत राजापूरचे पवार मित्रमंडळ विजेते





कुडाळ: १.राज्यस्तरीय ढोलताशा स्पर्धेचे उद्घाटन करताना परीक्षक सदानंद राणे. बाजूला अन्य मान्यवर. २.ढोलताशा स्पर्धेतील विजेत्या पवार मित्रमंडळ ढोलपथकाला पारितोषिक वितरण करताना डॉ. धनंजय राऊळ. बाजूला अन्य मान्यवर.

**कुडाळ येथे भैरव-जोगेश्वरी ढोलपथक, मित्रमंडळातर्फे आयोजन: गिर्येचे चौंडेश्वरी ढोलपथक द्वितीय.**

कणकवली / प्रतिनिधी

भैरववाडी येथील देव भैरव-जोगेश्वरी ढोलपथक व मित्रमंडळ आयोजित राज्यस्तरीय ढोलताशा स्पर्धेत राजापूरचे पवार मित्रमंडळ ढोलपथक विजेते ठरले. गिर्ये-देवगडचे देवी चौंडेश्वरी ढोलपथक द्वितीय, तर पोंभुर्ले-देवगडच्या जांभई हनुमान वाद्य मंडळाने तृतीय क्रमांक मिळविला. दहा मंडळांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता.

भैरव-जोगेश्वरी ढोलपथक व मित्रमंडळाच्या संकल्पनेतून सिंधुदुर्गात प्रथम आयोजित केलेली ही स्पर्धा नाविन्यपूर्ण ठरली. ढोलपथकांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले.

भैरव-जोगेश्वरी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त तेथील रंगमंचावर आयोजित या स्पर्धेला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे उद्घाटन स्पर्धा परीक्षक सदानंद राणे (मुंबई) यांच्या हस्ते दीप प्रज्लनाने झाले. भैरव-जोगेश्वरी मंडळाचे अध्यक्ष डॉ. धनंजय राऊळ, जि.प.सदस्य अमरसेन सावंत व नागेंद्र परब, मंडळाचे उपाध्यक्ष शरद मेस्त्री, सच्चिदानंद राऊळ, भैरव–जोगेश्वरी ढोलपथकाचे अध्यक्ष संकेत राऊळ, मिलिंद देसाई, बाळा राऊळ, प्रभाकर मेस्त्री, काना केसरकर, जितेंद्र सावंत, सुनील राऊळ, परीक्षक नितीन करंदीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मंदिराचे मानकरी मंगेश कुडाळकर व वसंत कुडाळकर यांच्या हस्ते ढोलताशांचे पूजन करण्यात आले.

**स्पर्धेचा उर्वरीत निकाल**

स्पर्धेचा उर्वरीत निकाल-उत्तेजनार्थ रामेश्वर-रवळनाथ ढोलपथक (तळगाव-राजापूर), उत्कृष्ट ढोलवादक-देवी चौंडेश्वरी ढोलपथक, ताशावादक-पवार मित्रमंडळ ढोलपथक व झांजवादक-भावईदेवी ढोलपथक (वरेरी-कुरमेवाडी, देवगड). विजेत्या मंडळांना अनुक्रमे १५ हजार, १० हजार, ७ हजार, ४ हजार रु. व प्रत्येकी चषक तसेच वादक विजेत्यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# नाणारमध्ये रिफायनरी समर्थकांचा मेळावा ३ मार्चला

राजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील नाणार रिफायनरी प्रकल्प होण्यासाठी सोमवारी (ता. २५) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माधव भंडारी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ भेटले असता त्यावेळी ३ मार्चला नाणार येथे प्रकल्प समर्थकांचा भव्य मेळावा घेणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाळ माने यांनी दिली.

रत्नागिरीतील शासकीय विश्रामगृहात माने पत्रकारांशी बोलत होते. माने म्हणाले, तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या नाणार येथील रिफायनरी प्रकल्प कोकणची प्रगती करणारा आहे. देशाचा जीडीपी दहा टक्क्याने वाढणार आहे. त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी राजापुरात २२ रोजी झालेला मेळावा ऐतिहासिक होता.

आतापर्यंत विरोधासाठी लोकांना भडकवले जात होते; परंतु ज्यांना हा प्रकल्प हवा आहे, त्यांच्यासाठी आम्ही पुढे आलो आहोत. त्यांची मागणी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचविण्यात येणार आहे. सोमवारी भंडारी यांच्यासह जिल्हाध्यक्ष बाळ माने, राजन गोगटे, राजापूर तालुक्यातील भाजप पदाधिकारी यांच्यासह विविध प्रकल्प समित्यांचे नेते यामध्ये सहभागी असतील. प्रकल्पासाठी पाच हजार एकर जमीन घेण्यात आली आहे. अनेक लोक जमिनी देण्यासाठी तयार आहेत. ज्यांची अडचण आहे, त्यांना वगळून अन्य जमीन घेऊन तेथे हा प्रकल्प सुरू करावा, अशी मागणी केली जाणार आहे.

या प्रकल्पामुळे दीड ते दोन लाख रोजगारनिर्मिती होणार आहे.त्यामध्ये स्थानिक तरुणांचीच भरती होईल,असा करार संबंधित कंपनीकडून केला जाईल. यापूर्वी खासगी कंपन्यांमध्ये परराज्यातील लोकांना संधी दिली जाते. यावेळी तसे करणार नाही. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वीस हजार अभियंत्यांना कंपनीत सामावून घेतले जाईल, असा विश्वास माने यांनी व्यक्त केला.

## ...तर, मत परिवर्तन होऊ शकते

प्रकल्प रद्दच्या मुद्यावर शिवसेना-भाजप युती झालेली आहे; मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपने सुरू केलेल्या या सकारात्मक प्रयत्नामुळे शिवसेनेची अडचण होणार आहे. युती झाली असतानाही हे प्रयत्न का सुरू केले या प्रश्नावर माने यांनी वरिष्ठ निर्णय घेतील, असे सांगितले. प्रकल्पाचे फायदे लोकांना माहीत नव्हते, ते समजल्यावर विरोधकांपैकी काहींचे मत परिवर्तन होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मुलुंडमधील सोसायट्यांना दिलासा हवा

**ॲड. हर्षद देसाई**

मुलुंड पूर्व-पश्चिम या भागात जवळपास पाचशे सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. शिवाय मुलुंड पश्चिमेचा भाग हा प्रचंड गजबजलेला वाटतो,तर त्या तुलनेत मुलुंड पूर्वेचा भाग हा शांत वाटतो याचा अर्थ या उपनगराच्या नियोजनात अधिक सुसूत्रता आली पाहिजे. त्याशिवाय अवैध पार्किंग , फेरीवाले, अस्वच्छता आणि वाहतुकीची कोंडी अशा समस्यांनी संपूर्ण उपनगर ग्रासलेले दिसून येते. मुलुंड हे मुंबईच्या पूर्व भागात असलेले शेवटचे उपनगर असल्याने इथल्या नागरीकांना आपल्या अनेक समस्या सोडवून घेण्याकरीता उपजिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, किंवा थेट मंत्रालय याकरीता बराच मोठा प्रवास करावा लागतो. सध्या या उपनगरात अनेक जुन्या सोसायट्या पुनर्विकास करीत आहेत. हा पुनर्विकास करताना सोसायट्यातल्या पदाधिकाऱ्यांना जो काही त्रास सहन करावा लागतो. तो धक्कादायक म्हणावा लागेल. अनेक सोसायट्यांना बिल्डरांनीच फसवलेले दिसून येते. मी स्वतः विकल असल्यामुळे अनेक सोसायट्यांना बिल्डरांनी ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिलेले नाही. कन्व्हेयन्स करून दिलेला नाही. एवढेच नव्हे तर त्या सोसायट्यांची नावे प्रॉपर्टी कार्डवरही लावलेली दिसून येत नाहीत.त्या सगळ्या कागदपत्रांची पूर्तता करण्याकरीता सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना थेट नव्या मुंबईतल्या रजिस्टारच्या ऑफिसपर्यंत खेटा घालाव्या लागतात. मुलुंडला तहसिलदार कार्यालय आहे परंतु तिथेही सर्व कार्यालयांची पूर्तता होत नाही. आता अलिकडेच कार्यालयाच्या या जागेवर मोठी प्रशासकीय इमारत उभारण्याची योजना आहे आणि ही सगळी मुलुंडकरांची तारांबळ थांबवण्याकरीता अनेक कार्यालयांच्या शाखा या इमारतीत एकाच ठिकाणी आणण्याचाही प्रस्ताव आहे तसे झाले तर लोकांसाठी हे फार महत्त्वाचे ठरू शकेल.

केवळ पूर्व उपनगराच्या किंवा ईशान्य मुंबई मतदारसंघाच्या शेवटी येणारे मुलुंड शहर दुर्लक्षित होता कामा नये. पूर्व द्रुतगती मार्ग किंवा एलबीएस रोड या ठिकाणी वाहतुकीची होणारी कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत आहे. मेट्रो रेल्वेमुळे एलबीएस मार्गाला थोडा दिलासा मिळेल. परंतु मुलुंड पूर्वेला शहरात आता येताना जी वाहतुकीची कोंडी होते ती समस्या आणखी दोन नवे एन्ट्री पॉईंट देऊन सोडवली गेली पाहिजे. मुलुंड पूर्व आणि पश्चिम परिसर व्यापारी भाग असल्याने तिथे अधिक स्वच्छता आणि रस्ते मोकळे ठेवण्याची गरज आहे. आजही मुलुंड पश्चिमेला पाच रस्ता, मुलुंड चेकनाका, या भागामध्ये संध्याकाळच्या वेळी बाहनांची बरीच गर्दी होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुलुंड पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा आज केवळ एकच उड्डाण पूल उपलब्ध आहे. जर आणखी एका उड्डाणपूलाची निर्मिती झाली तर वाहतुक कोंडी दूर होईल. पूर्वेला असलेल्या रेल्वे डेपोच्या काही जागेचा वापर करून मुलुंड पश्चिमेला उतरणारा एक उड्डाण पूल आकाराला येऊ शकतो.

स्वच्छता आणि सुरक्षितता हे दोन्ही महत्त्वाचे प्रश्न असून याकरीता राज्य सरकार तसेच महापालिका यांनी विशेष प्रयत्न करायला हवेत. प्रामुख्याने मुलुंड उपनगरामध्ये अल्प उत्पन्न गटातील लोकांची संख्या चाळीस टक्के आहे. चाळीस टक्के लोकसंख्या ही मध्यमवर्गीयांची आहे तर वीस टक्के लोकसंख्या ही उच्च मध्यमवर्गीयांची आहे असे दिसून येते. सहकारी गृहनिर्माण संस्थांची सर्वाधिक संख्या लक्षात घेता जवळपास सत्तर टक्के लोक गृहनिर्माण संस्थांमध्ये राहतात. अशावेळी या संस्थांची देखभाल त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा आणि पुनर्विकासाच्या प्रकल्पांमध्ये अधिक दिलासा देण्याची गरज आहे.



# विकास निधी वाढला पाहिजे

मुंबईच्या विकासासाठी पन्नास हजार कोटींचा निधी पंधराव्या वित्त आयोगाने द्यावा अशी मागणी करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. पण यात वाढ अपेक्षित आहे. कारण दरवर्षी दहा हजार कोटी रुपये वित्त आयोगाकडून देण्याची जर तरतूद असेल तर पाच वर्षासाठी पन्नास हजार कोटी मागितल्यानंतर त्यात वाढीव निधी उपलब्ध होत नाही. याचा अर्थ वर्षाकाठी दहा हजाराच्याऐवजी वीस हजार कोटींची मागणी केली पाहिजे. मुंबईच्या अनेक समस्या आहेत. सव्वा कोटी लोकसंख्या असलेल्या महानगराला आता लोकांच्या गर्दीबरोबरच समस्यांच्या गर्दीनेही वेढले आहे.

गर्दीच्या तुलनेत समस्यांची गर्दी कमी करण्यात सरकारला मोठीच कसरत करावी लागत आहे. गर्दी कमी होणे शक्य नाही. किंवा त्याच्यावर नियंत्रण आणणेही सरकारला साध्य करता येणारे नाही. अशा परिस्थितीत समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी म्हणजेच त्यावरचे उपाय शोधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैशाची गरजही भासेल. याच निधीच्या कमतरतेमुळे एवढ्या मोठया आंतरराष्ट्रीय महानगरात मेट्रोसारखा प्रकल्प यायला काही वर्षाचा कालावधी गेला. जर गर्दीचा अंदाज घेऊन समस्यांची वेळच्यावेळी पूर्तता झाली असती तर पंचवीस वर्षापूर्वीच मुंबईत मेट्रो यायला हवी होती. आतादेखील मेट्रोचे बांधकाम झाल्यानंतरही वाहतुकीची कोंडी कायम राहाण्याची शक्यता आहे. मुंबईत 25 लाखापेक्षा जास्त वाहने आहेत. एवढेच नव्हे तर एक कोटीपेक्षा जास्त लोकांकडे वाहनचालकाचे परवाने आहेत. अनेकवेळेला स्वतचे वाहन जरी नसले तरी लोक ड्रायिव्हंग लायसन्स काढून ठेवतात. अलिकडे तर महिला वाहन चालकांची संख्या वाढली असल्याचे वाहतुक विभागाचे म्हणणे आहे. या आकड्यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते की माणसांबरोबर वाहनांची संख्या तितक्याच वेगाने वाढते आहे. म्हणूनच भविष्यकाळात मुंबईला वाहतुक व्यवस्थेच्या समस्येला तोंड द्यावे लागेल. मुंबईच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्याकरीता दोन दोन तासाचा कालावधी लागतो. आणि उपनगरीय रेल्वे वाहतुक माणसांच्या गर्दीने ओसंडून वाहात असते. या सर्व मुद्द्यांचा विचार केला तर वित्त आयोगाकडे पैसे मागताना सरकारने योजनांचा प्राधान्यक्रम ठरवला पाहिजे. आणि मिळणारा पैसा हा मुंबईसाठीच त्या त्या वेळापत्रकाप्रमाणे खर्चही केला पाहिजे.

### आर्थिक राजधानीचे महत्व

प्रचंड गर्दीच्या या महानगरात मेट्रो, मोनो यांच्या मार्गांबरोबरच केवळ उड्डाणपूलांची गर्दी करूनही उपयोगाचे नाही आहे त्याच रेल्वे मार्गांवर उन्नत रेल्वे मार्ग उभारण हा या वाहतुकीवरचा प्रभावी उपाय ठरू शकतो. परंतु अजूनही सरकारला या गोष्टीचे महत्व पटलेले दिसत नाही. म्हणूनच वाहतुक व्यवस्था उत्तम दर्जाची निर्माण करणे आवश्यक आहे. आणि याच्या बरोबरीने मुंबईच्या गर्दीचे विकेंद्रीकरण करणे या गोष्टीलाही प्राधान्य द्यावे लागेल. दक्षिण मुंबईत असलेली सर्व सरकारी कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरित केली पाहिजे. मुंबई ही जर देशाची आर्थिक राजधानी असेल आणि तिच्या विकासासाठीच पैशाची याचना करावी लागत असेल तर याच्याइतके दुसरे दुर्दैव नाही. आर्थिक केंद्र असलेल्या मुंबईत अर्थव्यवहाराशी संबंधित कार्यालये असणे जास्त योग्य ठरते. प्रशासकीय कार्यालयांना मुंबईच्या बाहेर नेता येऊ शकते. तरच गर्दीवर नियंत्रण आणता येईल. दरवर्षी येणारा पावसाळा आणि त्यावेळी होणारी मुंबईकरांची तारांबळ हेही आता नित्याचे झाले आहे. कचऱ्यासारखी भीषण समस्या अजूनही पूर्णपणे सुटलेली नाही यामध्ये कोर्टाला लक्ष घालावे लागले त्यानंतर डंपिंग ग्राऊंडच्या संदर्भात महापालिकेने हालचालीना सुरुवात केली. इमारती बांधण्यासाठी जी महापालिका धडाधड परवानग्या देते त्या महानगरात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरता सक्षम यंत्रणा नाही. कचरा कुठे टाकायचा असा गंभीर प्रश्न निर्माण झाला असताना महापालिका मख्खपणे बघत असेल किंवा कोर्टाची वाट पाहात असेल तर तीदेखील मुंबईच्या विकासाचीच शोकांतिका ठरते. या सर्व गोष्टीचा विचार करून पंधराव्या वित्त आयोगाकडे पैशांची मागणी केली गेली पाहिजे. म्हणूनच विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरवला जावा यासाठी मुंबईतल्या काही तज्ञांची गाठभेट घेतली जावी केवळ राजकारण्यांच्या भरोशावर हा प्राधान्यक्रम ठरवता येणार नाही. पैसा मागत असताना त्याच्या योग्य खर्चाचे तपशील जर सादर झाले आणि कालबद्ध विकासाचे गणित मांडले गेले तरच त्याला मंजूरी मिळण्याची शक्यता असते.

# ईशान्य मुंबईत विकासाला वाव आणि समस्यांचा प्रभाव

मुंबईच्या लोकसभा मतदार संघापैकी दुसऱ्या क्रमांकाचा मोठा मतदार संघ म्हणून ईशान्य मुंबई मतदार संघाचा उल्लेख होतो. सर्वात मोठा उत्तर मुंबई हा मतदार संघ आहे. आज ईशान्य मुंबईच्या विकासाचा विचार केला तर बरेच मूलभूत प्रकल्प राबवले गेलेले नाहीत. चेंबूरपासून मुलुंडपर्यंतचा हा पूर्वउपनगरातील मोठा पट्टा अनेक सुविधांपासून वंचित आहे. विशेषतः सामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या गोष्टींकडे देखील दुर्लक्ष झालेले दिसून येते. खरे तर जमीनीची उपलब्धता असताना या मूलभूत सोयीसुविधा का मिळाल्या नाहीत. याचे देखील आश्चर्य वाटू लागते. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हे त्याचे कारण आहेच. त्याशिवाय पालिकेच्या शहर नियोजनातही या मतदारसंघाला न्याय मिळू शकलेला नाही. भांडुप-विक्रोळी किंवा चेंबूरचा बराच मोठा भाग औद्योगिक पट्ट्यामध्ये जोडतो. गेल्या काही वर्षात भांडुप विक्रोळी या टप्प्यातल्या अनेककंपन्या बंद झाल्या आणि या कंपन्याच्या जमीनीवर टोलेजंग टॉवर्स उभारून पैसा कमावला म्हणजे लोकसंख्येच्या दृष्टीने नागरी वस्ती वाढली. तर त्याप्रमाणात नागरी सुविधा मिळू शकल्या नाहीत. त्या नागरी सुविधांमध्ये प्रशस्त रुग्णालय, क्रीडांगणे, चांगली महाविद्यालये, पोस्ट ऑफिसेस, पेट्रोल पंप किंवा झोपडपट्ट्यांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रेसुध्दा सुधारली गेली नाहीत. म्हणजे नागरी वस्ती वाढूनही नागरी सुविधा न मिळालेला किंवा वंचित राहिलेला ईशान्य मुंबई हा मतदार संघ ठरतो.




गेल्या अनेक वर्षापासून चेंबूर ते मुलुंड या दरम्यान महापालिका किंवा राज्य सरकारचे केईएम किंवा सायन रुग्णालयांप्रमाणे प्रशस्ती रुग्णालय असावे अशी मागणी केली जात आहे पण त्याकडे दुर्लक्ष झाले. पालिकेच्या विकास आराखड्यात रुग्णालयांसाठी गेल्या पंचवीस वर्षात रुग्णालय मात्र उभे राहिले नाही. या भागातील सामान्य नागरिकांना तातडीच्या किंवा गंभीर उपचारांसाठी सायन किंवा केईएममध्ये धाव घ्यावी लागते. हल्ली तर या भागात वाहनांचीही संख्या वाढली आहे. रस्ते अपुरे पडू लागले आहेत. अशावेळी गंभीर परिस्थितीतून रुग्णाला रुग्णालयात पोहचवण्यासाठी वाहतुकीतल्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो. एकूण लोकवस्तीचा विचार केला तर एका सुसज्ज रुग्णालयाची या मतदार संघामध्ये अत्यंत आवश्यकता आहे. खाजगी रुग्णालये परवडत नाहीत. आणि सरकारी रुग्णालये उपलब्ध नाहीत. अशा वेळी सामान्य माणसाच्या आरोग्याशीच मोठा खेळ केला जातो.

त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरात प्रशस्त असे अंधेरी स्पोर्टस कॉम्प्लेक्स आहे पूर्व उपनगरात एकही असे स्पोर्टस कॉम्प्लेक्स नाही. सरकारकडे किंवा महापालिकेकडे जागा असूनही असे स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारण्याचा कोणीही पाठपुरावा केला नाही. एकूणच ईशान्य मुंबई मतदारसंघात मोकळ्या मैदानांची तीव्र टंचाई आहे. गोदरेजसारख्या कंपनीकडे प्रचंड जमीन उपलब्ध आहे त्यातली काही एकर जमीन संपादित करता येऊ शकते आणि सर्व सुविधांनी युक्त असे क्रीडासंकुलही उभारता येऊ शकते. खरे तर ईशान्य मुंबईत मीठागरांचीही भरपूर जागा आहे. परंतु त्या जागेतही केंद्र आणि राज्य सरकारमध्ये समन्वय दिसत नाही.

घाटकोपरपासून मुलुंडपर्यंत मेट्रो रेल्वेचा लाभ लोकांना होईल. परंतु एलबीएस रोडवरची वाहतुक कोंडी हा देखील अतिशय महत्वाचा मुद्दा ठरतो. तीच परिस्थिती चेंबूर, मानखुर्द गोवंडी या परिसरात आहे. विशेष म्हणजे गोवंडी, मानखुर्द, चेंबूर इथल्या झोपडपट्ट्यांचा प्रश्न तितकाच गंभीर आहे तर नाहूर भागात गेले वर्षभर पाणी आणि हवेच्या प्रदूषणाने थैमान घातले आहे. माहूल परिसरातल्या अक्षरशः शेकडो रहिवाशांना ग्रासले आहे, एवढेच नव्हे तर कर्करोगासारखे रोगाचीही लक्षणे लोकांमध्ये दिसून आली. तिथल्या या प्रदूषणाविरोधात प्रसार माध्यमांनी आवाज उठवल्यावर सरकारी यंत्रणांना जाग आली आणि आता त्यांच्या स्थलांतराची किंवा पुनर्वसनाची चर्चा सुरु झाली आहे. काही लाख लोकांची माहूल परिसरातील वस्ती अशा धोकादायक परिस्थितीत राहात असेल तर तो अतिशय गंभीर भाग ठरतो. हा प्रश्न तितक्याच वेगाने सोडवला जाणे अपेक्षित होते. या मतदार संघाचा राजकीयदृष्ट्या विचार केला तर या ठिकाणी एकूण पस्तीस नगरसेवक आहेत. त्यातील सर्वाधिक म्हणजे १६ नगरसेवक शिवसेनेचे, १२ भाजपाचे, काँग्रेस राष्ट्रवादीचे चार आणि समाजवादी पार्टीचे तीन नगरसेवक आहेत. स्थानिक स्तरावरचे प्रश्न नगरसेवकांकडून सोडवले गेले पाहिजेत तर केंद्र आणि राज्य सरकारशी संबंधित प्रकल्प किंवा प्रश्न खासदार आणि आमदारांकडून मार्गी लागले पाहिजेत. ईशान्य मुंबईत विकासाला वाव आहे. आणि समस्यांचाही प्रभाव आहे असे म्हणावे लागते.

# मुलुंडचा गतीने विकास शक्य - मनोज कोटक



ईशान्य मुंबईच्या विकासाचा विचार करत असताना अनेक महत्त्वाचे प्रश्न समोर येतात. तसेच काही महत्त्वाचे विषय मार्गी लागल्याचेही पाहायला मिळते. कोणताही विकास हा जनसामान्यांसाठी करायचा असतो. सरकारने गरज ओळखायची असते. आणि तशा प्रकारचे प्रकल्प प्रत्यक्षात आणायचे असतात. म्हणजेच त्यासाठी पुढाकार घ्यायचा असतो. ज्याप्रकारे मुलुंडसारख्या उपनगरात वाहतुकीच्या कोंडीचा प्रश्न गंभीर बनला होता त्यावेळी पूर्व द्रुतगती मार्गाचा झालेला विकास त्यानंतर वाहतुकीची होणारी कोंडी किंवा मुलुंड पूर्वेला म्हाडा सिग्नलकडून उपनगरात येण्यासाठी मोठी वाहतूककोंडी होऊ लागली. त्यावेळी लोकांची ही अडचण प्राधान्यक्रमाने सोडवली पाहिजे असा आग्रह आम्ही भाजपातर्फे महापालिकेकडे धरला. मी स्वतः गटनेता असल्यामुळे महापालिकेत याविषयाचा पाठपुरावा केला. पूर्व उपनगरात येण्याकरिता आणखीन दोन पर्यायी मार्गांसाठी जागाही सुचवली. आणि केवळ सहा महिन्यांच्या आत म्हाडा सिग्नल ओलांडून एक नवा पर्यायी मार्ग सुरूही केला गेला. परंतु तेवढ्याने काम भागणार नाही. अजून एका पर्यायी मार्गाची सोय केली जाणार आहे. त्याची जागाही निश्चित झाली आहे. याचा अर्थ दैनंदिन गरजेची विकासकामे जितक्या वेगाने होतील तितका लोकांना जास्त उपयोग होतो. आणि दुसरा भाग म्हणजे अशी कामे करून घेण्याकरिता पाठपुरावाही तितकाच महत्त्वाचा ठरतो. गेल्या काही वर्षांपासून मुलुंड पूर्वेला पेट्रोल पंपची सुविधा नाही. त्यामुळे अक्षरशः लाखो लोकांना फार मोठी गैरसोय सहन करावी लागते. यासंदर्भातही अशाच पाठपुराव्याची आवश्यकता आहे. जागेची उपलब्धता होऊ शकते. परंतू राष्ट्रीय स्तरावरचेच निर्णय होणं गरजेचे असते. पेट्रोल पंपासाठी जागा हीच प्रमुख अडचण असते. परंतू येणाऱ्या कालावधीत हा प्रश्नही तातडीने सुटेल अशी मला खात्री वाटते. कारण मुलुंड पूर्वेला पोस्ट ऑफिसबाबतही अशीच तक्रार होती. त्याचा पाठपुरावा करून तिचेही आम्ही निवारण केले. मुलंड पश्चिमेला सध्या मेट्रोचं काम जोरात सुरू आहे. मात्र त्याच्याबरोबरीने रस्ते-वाहतुकीची कोंडी सोडविण्याचाही प्रयत्न करावा लागणार आहे. मुलंड पश्चिमेला अनेक लोकांच्या आरोग्यविषयक सुविधा दूर करण्याकरिता अनेक प्रयत्न सुरू आहेत. तर प्रत्येक विभागामध्ये स्वच्छतेचे महत्त्व बिंबविले जात आहे. अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये ओला आणि सुका कचरा वेगळा करून त्याची विल्हेवाट लावण्याची सुविधा महापालिकेच्या खर्चाने करवून घेण्याचा माझा प्रयत्नही यशस्वी होत आहे. कारण यासाठी मोकळ्या जागेत खड्डे तयार करून ती व्यवस्था निर्माण करावी लागते.

तसेच प्रत्येक सोसायटीला त्याबाबतचे योग्य प्रशिक्षणही द्यावे लागते. महापालिकेच्या अशा अनेक योजना आहेत ज्याचा एकाच वेळी अनेक लोकांना फायदा होऊ शकतो. जर सोसायट्यांकडे जागा उपलब्ध असेल तर त्याठिकाणी ओपन-जिम सारख्या सुविधा निर्माण करता येऊ शकतात. मुलुंडमधल्या अनेक सोसायट्यांमध्ये आपण हा उपक्रम यशस्वी करून दाखवला आहे. मुलुंड उपनगराचे किंबहुना ईशान्य मुंबईचे अनेक प्रश्न सहजपणे मार्गी लागू शकतील. मिठागरांची बरीच जमीन उपयोगात आणता येऊ शकेल. प्रामुख्याने आरोग्यसुविधा, मैदाने, स्वच्छता, अवैध पार्किंग, फेरीवाले याविषयांचा प्राधान्यक्रमाने विचार करण्याची आवश्यकता आहे. यातल्या अनेक समस्यांबाबत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेकडे पाठपुरावाही सुरू आहे.

# ईशान्य मुंबईला विकासात मोठा वाव

**दिलीप देशमुख**

मुंबईच्या विकासाचे नियोजन हे भविष्यातील आवश्यकता किंवा गरजा लक्षात ठेवून केले जाते. मर्यादित जागा, वाढती लोकसंख्या आणि नागरीकांना उपलब्ध करून द्यायच्या साधनसुविधा अशा तीन मुद्यांच्या आधारावर विकासाची धोरणे नक्की होतात. आतादेखील २०३४ पर्यंत तयार केलेल्या विकास नियोजन आणि प्रोत्साहन नियमावलींच्या आराखड्यात याच गोष्टींचा उल्लेख दिसून येईल परंतु एवढ्या मोठ्या महानगराचा विकास आराखडा तयार करताना स्थानिक स्तरावरच्या त्या त्या उपनगराची किंवा लोकांची आवश्यकता विचारात घेतली जातेच असे नाही. मुंबई उपनगरातही काहीसे असेच झालेले दिसून येते. विशेष म्हणजे महापालिकेसाठी शासनाने दोन वेळा त्यातल्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला. महापालिकेच्या माननीय आयुक्तांनीसुध्दा स्वतःच पुढाकार घेऊन विकास नियोजन खात्यातल्या संबंधितांशी तसेच विभागातील साहाय्यक आयुक्तांशी चर्चा करून ज्या काही त्रुटी

*लेखक प्रसिद्ध आणि ज्येष्ठ वास्तुतज्ज्ञ आहेत.*



*गेली पस्तीस वर्षे ते या व्यवसायात असून त्यांना नियोजन क्षेत्रातील कामाबद्दलचे प्रोत्साहन पुरस्कारही मिळाले आहेत. महानगर विकास परिषद या सामाजिक संघटनेचे ते अध्यक्षही आहेत.*

राहिल्या असतील त्याची प्रत्यक्ष किंवा समक्ष पाहाणी करून अहवाल सादर करण्याचे आदेशही दिले गेले. आयुक्तांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली या त्रुटी दूर करून विकासप्रस्तावांची रचना केली गेली.

विकास आराखड्याचा विचार करीत असताना शहर नियोजनकार म्हणजेच टाऊन प्लॅनर्स, आर्किटेक्ट अशा या विषयाशी संबंधित सर्वांना विश्वासात घेऊन त्यांच्याशीही चर्चा केली. त्यांच्या हरकती आणि सूचनांची दखल घेतली गेली. आणि अंतिमतः २५ मे २०१८ ला हा अहवाल पुन्हा शासनाला सादर केला गेला. या सगळ्या प्रक्रियेत विकास आराखडा जवळजवळ नवीनच तयार झाला, असे म्हणता येईल. मुंबई महापालिकेने प्रथमच अशा प्रकारचा विकास आराखडा स्वतःच्या देखरेखीखाली पूर्ण केला असावा. यासाठी पालिकेचे आयुक्त श्री अजोय मेहता यांचे मी विशेष अभिनंदन करतो.

ईशान्य मुंबई या मतदारसंघाचा विचार केला तर त्यांची लोकसंख्या ३८.३० लाख २०३४ पर्यंत होईल. त्याचे उपलब्ध क्षेत्रफळ १७,८५९.६३ हेक्टर एवढे आहे. यापैकी ५२ टक्के क्षेत्रफळ विकसित झालेले आहे. विकसित न झालेले ३५ टक्के क्षेत्रफळ आहे तर १३ टक्के




क्षेत्रफळ अजूनही अनेक मूलभूत सोयीसुविधांसाठी विकसित करता येऊ शकते. नव्या आराखड्याप्रमाणे प्रतिमाणसी चार चौरस मीटर मोकळी जागा प्रमाणित केली गेली आहे. या धोरणानुसार १६२२.११ एवढी हेक्टर मोकळी जागा आराखड्यामध्ये प्रस्तावित करायला हवी होती. परंतु सध्या केवळ १२५४.४७ हेक्टर एवढीच मोकळी जागा उपलब्ध केली गेली आहे. खरे तर शाळा, महाविद्यालये यासाठीसुध्दा ईशान्य मुंबईत लोकसंख्येच्या तुलनेत ६३८.३१ हेक्टर जागा उपलब्ध होणे गरजेचे ठरते. प्रत्यक्षात मात्र २३४.९५ हेक्टरच जागा मुंबई महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली आहे. याचा अर्थ असा होतो की अशा शाळा, महाविद्यालये प्राथमिक, माध्यमिक शाळांसाठी २.७१ चटई निर्देशांक गरजेचा ठरतो. मात्र त्यासाठी मोठा खर्च करावा लागतो आणि मग शाळा, महाविद्यालयांना अशा खर्चासाठी खाजगी आरक्षणांवर अवलंबून राहावे लागेल. खरे तर काळाची गरज लक्षात घेऊन या सर्व आरक्षणांवर कालबद्ध विकास करण्याची सक्ती मुंबई महापालिका करणार का असा प्रश्न निर्माण होतो.

आरोग्यसुविधांबाबतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात 869.15 हेक्टर जमिनीची आवश्यकता भासते. परंतु आज १६९.९२ हेक्टर जमीनच उपलब्ध आहे अशावेळी या मर्यादित जागांवर ५.११ असा मोठा चटई निर्देशांक दिल्यावर आरोग्य सुविधांची पूर्तता होऊ शकत नाही.

सर्वात महत्त्वाचा विषय हा झोपडपट्टी पुनर्वसनाचा आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे ईशान्य मुंबई १९ लाख ८८ हजार २०० एवढी लोकसंख्या झोपड्यामध्ये राहाते. म्हणजे मुंबईच्या एकूण ४० टक्के झोपडपट्ट्यांमध्ये राहाणारी जनता ईशान्य मुंबईत राहते. यापैकी सर्वात जास्त झोपड्या म्हणजेच ५ लाख ३७ हजार ९०० झोपड्या एस वॉर्डमध्ये येतात. त्याखालोखाल एल वॉर्डमध्ये ४ लाख ९० हजार झोपड्या आहेत. ईशान्य मुंबईतील या झोपड्या पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत. याकरीता सरकारला विशेष धोरण राबवावे लागेल.

या विकास आराखड्यामध्ये परवडणाऱ्या घरांकरीता स्पेशल डेव्हलपमेंट झोन अशा शीर्षकाखाली संबोधले गेले आहे. यातल्या मोठ्या जागा म्हणजे ज्या दोन हेक्टरपेक्षा जास्त मोकळ्या आहेत त्यांना दोनशे पन्नास स्क्वेअर मीटर कार्पेट एरियाप्रमाणे तीस टक्के निवासी जागा महापालिकेला किंवा शासनाला विनामूल्य सुपूर्द करायची आहे. या पद्धतीने अफोर्डेबल हौसिंगचा विचार केला तर दर पाच वर्षांनी किमान पन्नास हजार घरे निर्माण होतील. आणि एकूण दोन लाख घरे अल्प उत्पन्न गटासाठी शासन वितरित करू शकेल. ईशान्य मुंबईमध्ये या अफोर्डेबल हौसिंगसाठी खूप मोठा वाव आहे. पूर्व द्रुतगती मार्गावर मीठागरांमुळे ७५ हेक्टर जागा उपलब्ध होऊ शकते. या जागांचा विकास झाला तर पुढील पाच वर्षात या परिसरात पन्नास हजार घरे उपलब्ध होऊ शकतील. स्वाभाविकपणे या विकास कामांमुळे ईशान्य मुंबईतील रोजगाराचे (पान ७ वर)

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

BHARAT BILLPAY

युटिलिटी बिल पेमेंट करणे आता अधिक सोपे, अधिक सुरक्षित

गॅस, वॉटर, टेलिकॉम, आणि इलेक्ट्रीसिटी बिल पेमेंट्ससाठी आपल्या जवळच्या शाखेत संपर्क साधा

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात आणि मध्यप्रदेशात एकूण 136 शाखांसह कार्यरत

tjsbonline tjsbbank tjsbbank tjsb-sahakari-bank-ltd

प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय :
टीजेएसबी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र. २, वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम)-४०० ६०४.
टोल फ्री क्र.: १८०० २२३ ४६६ | www.tjsbbank.co.in

# ईशान्य मुंबईतही प्रदुषणाची समस्या

मुंबईत हवाप्रदूषणाने अनेक प्रकारचे रोग निर्माण होत असल्याचे वास्तव पुढे आले आहे. आणि हे हवाप्रदूषण वाहनांच्या धुरामुळे विविध प्रकारच्या बांधकामांमुळे आणि काही औद्योगिक कंपन्यांमुळे होत असल्याचे सांगितले जाते. शुध्द हवा मुंबईकरांना मिळत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. या अशुध्द हवेमुळे मुंबईत दम्याचे सर्वाधिक रुग्णही आढळून येतात.मुळातच दमट हवामान असलेल्या या महानगरात सर्व प्रकारची दाटीवाटी झाल्यामुळे हवा प्रदूषणाचे प्रमाण वाढणे तितकेच स्वाभाविक म्हणावे लागते. कारण हवा प्रदूषणामध्ये ध्वनीप्रदूषणाचाही नकळतपणे सहभाग असतो. आज जवळपास पंचवीस लाखापेक्षा जास्त वाहनसंख्या या महानगरात आहे. शिवाय उपनगरीय गाड्यांची संख्या त्यांचा आवाज वेगवेगळ्या उत्सव आणि समारंभांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ध्वनीक्षेपकामधून होणारे प्रदूषण, या सर्वांचा एकित्रत परिणाम नागरिकांच्या शरीरावर होत असतो. त्यात पुन्हा मुंबईची पन्नास टक्के लोकवस्ती झोपडपट्टी किंवा चाळींमधून निवास करते. दहा बाय दहाच्या खोलीमध्ये जवळपास सहा जणांचे कुटुंब वर्षानुवर्षे राहाते. अस्वच्छता प्रदुषित पाणी आणि रोजीरोटीकरीता वेळ पडल्यास कुठेही काम करायची तयारी ठेवावी लागत असल्याने इतर अनेक प्रकारच्या प्रदूषणांचाही त्यांच्यावर परिणाम होतो. चेंबूर जवळच्या माहुल भागात या हवा



प्रदूषणाची सर्वात उच्च पातळी असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले. भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम, राष्ट्रीय खत कारखाना अशा अनेक मोठ्या कारखान्यांच्या परिसरात जवळपास दोन लाखाची वस्ती आहे तिथून बाहेर पडणाऱ्या दूषित वायूमुळे तिथल्या अनेकांना त्वचारोग होत असल्याचे आढळून आले. दमट हवा असल्यामुळे हवेतील दूषित कण त्याचिठकाणी राहातात. अनेकवेळेला ते पाण्यामध्ये पडतात आणि पिण्याच्या पाण्यातूनही काही रोगांचा प्रादुर्भाव होतो. याचा अर्थ एकटे वायू प्रदूषण कितीतरी समस्यांना किंवा रोगांना आमंत्रण देणारे ठरते. यासंदर्भात सरकारी पातळीवर फारच शांतता दिसते. आणि आपल्या देशामध्ये ही परंपरा आहे की मोठी दुर्घटना घडल्याशिवाय सरकार जागे होत नसते. आज वायू प्रदूषणामुळे होणाऱ्या अनेक व्याधी किंवा रोग हे वेगवेगळ्या ठिकाणी व्यक्तीगत पातळीवर सहन केले जातात. परंतु जर का या सगळ्या वायूप्रदूषणाचे सर्वेक्षण केले गेले. तर भविष्यकाळातील दुष्परिणामांचा सहजपणे अंदाज येऊ शकतो. चाळीस वर्षापूर्वीच चेंबूर भागामध्ये याच वायूप्रदूषणाने धुमाकुळ घातला होता. प्रसिध्द अभिनेता राजकपूर चेंबूरमध्येच राहात होता त्याला स्वत ला दम्याचा विकार होता. आणि त्याकाळात चेंबूरमध्ये झालेल्या सभेला तो स्वत उपस्थित होता. त्यावेळी चेंबूरला गॅस चेंबर असेही म्हटले जात होते. इतकी त्याची गंभीर परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली होती.

**दुर्घटनेची वाट पाहू नका**

मधल्या काळात मुंबईतील अनेक औद्योगिक कंपन्या बंद पडल्या. विक्रोळी ते भांडुप हा एकेकाळी मुंबईतील मोठा औद्योगिक पट्टा होता तिथे आता एकही कंपनी शिल्लक राहिलेली नाही. चेंबूर तुर्भे भागातील ८० टक्के कंपन्या बंद पडल्या. अर्थात यातल्या अनेक कंपन्या उत्तर राज्यांमध्ये स्थलांतरित झालेल्या आहेत. प्रत्यक्ष मुंबई शहरात पंचवीस ते तीस कापडिगरण्या होत्या त्यादेखील आता अस्तित्वात नाहीत. या सर्व कंपन्या जर आज शिल्लक असत्या तर वायू प्रदूषणाची पातळी काय राहिली असती याची कल्पनाही करता येत नाही . शेजारच्या ठाणे महानगराला लागून कळवा बेलापूर पट्ट्यातील कंपन्याही अशाच पध्दतीने बंद पडल्या आहेत. तरीदेखील आज मुंबईतील हवा प्रदूषण धोक्याच्या पातळीपेक्षाही पुढे गेलेले आहे याची आताच योग्य ती दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. कोणत्याही तक्रारीची किंवा दुर्घटनेची वाट न बघता सरकारने काही तज्ञांचा सल्ला घेऊन हे वायू प्रदूषणाचे सर्वेक्षण केले पाहिजे. आणि उपाययोजनांचा आराखडाही सादर केला पाहिजे. आज महाराष्ट्रात प्रदूषण नियंत्रण मंडळे आहेत पण या मंडळाची अवस्था 5 जूनच्या पर्यावरण दिनाच्यानिमित्ताने जाहीरात पुरवणी काढणे, मंत्र्यांच्या मुलाखती छापून आणणे किंवा गरज नसेल तिथे कंपन्यांना नोटीसा पाठवून उद्योजकांना घाबरवण्याचे काम करणे असा त्या मंडळाचा उपदव्याप चालू असतो. प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी हे मंडळ काय करते असा जर कोणी प्रश्न विचारला तर मंडळाकडे समाधानकारक उत्तर मिळू शकणार नाही आणि मग त्यावेळी आमच्याकडे पुरेसा निधी नाही. पुरेसे कर्मचारी नाहीत. अशी कारणे पुढे केली जातील. प्रदूषण नियंत्रण मंडळातच आपल्या जबाबदारीबद्दल प्रदूषित वातावरण आहे. म्हणूनच मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महानगरातील पर्यावरणाचा दर्जा राखला जाईल. अधिकाधिक शुध्द हवा ठेवण्याचा प्रयत्न करण्यासाठी आतापासूनच प्रयत्न व्हायला हवेत. सरकारने स्वत पुढाकार घेऊन उपाययोजना केली पाहिजे. सतत हवा येऊ द्या असे म्हणणाऱ्या मुंबईसाठी प्रदूषित हवा जाऊ द्या असे सांगण्याची वेळ मुंबईकरांवर आली आहे.

---

# ईशान्य मुंबईला विकासात मोठा वाव

(पान ६ वरून) प्रमाणाही वाढू शकेल. प्रस्तावित विकास आराखड्यात २३९ अशा सुविधांकरीता जागांचे आरक्षण प्रस्तावित केले गेले आहे. त्यामध्ये वृध्दाश्रम, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल्स, बेघरांसाठी निवारा, कम्युनिटी सेंटर अशांचा समावेश होतो. या सर्वांचा विकास करायचा असेल तर तो कालबध्द योजनांतूनच होऊ शकेल.

व्यावसायिक जागांसाठी शासनाने विशेष धोरण आखलेले आहे. खाजगी क्षेत्रामध्ये जर व्यावसायिक विकास करायचा असेल तर किमान दोन तर कमाल पाच चटई निर्देशांकाची तरतूद केली गेली. त्यातही वीस हेक्टर जागा जर उपलब्ध झाली तर तीन किंवा चार चटई निर्देशांक वापरता येणार आहे. त्यामध्येच आयटी पार्क सारख्या सुविधा विकसित करता येऊ शकतात. पश्चिम उपनगरे व शहर यांच्या तुलनेत ईशान्य मुंबईत मोकळ्याा जागांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

पुढची पंधरा वर्षे आराखड्याची नीट अंमलबजावणी झाली तर हा विकास निरंतर सुरु राहू शकतो. म्हणूनच विकास आराखडा राबवताना काही सुविधांना महापालिकेने प्राधान्य दिले पाहिजे. ईशान्य मुंबईत प्रत्येक वॉर्डमध्ये एक तरणतलाव, मनोरंजन केंद्र, खेळण्यासाठी मैदाने किंवा उद्याने पालिकेने नवीन उपलब्ध करून दिली पाहिजेत. पुढच्या पाच वर्षात त्यांचा विकासही झाला पाहिजे.

सगळ्या मुंबईतच विशेष गाजणारा फेरीवाल्यांचा प्रश्न ईशान्य मुंबईलाही भेडसावत असतो अशावेळी पुढच्या पाच वर्षात या फेरीवाल्यांना एका विस्तीर्ण मनोरंजन मैदानाच्या खाली म्हणजे भूमिगत असा पालिका बाजार उपलब्ध करून द्यावा अशा प्रकारचा पालिका बाजार दिल्लीच्या काही भागात पाहायला मिळतो. यामुळे रस्ते आणि पदपथ मोकळे राहातात. मुंबईतल्या जागेची टंचाई लक्षात घेता फेरीवाल्यांइतकाच पार्किंगचा प्रश्न गंभीर झाला आहे. अलिकडे तर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत ज्यांचे पुनर्वसन झालेले आहे असे लोकही आपापली वाहने कुठेही उभी करतात. कारण त्यांच्या इमारतींमध्ये पार्किंगची पुरेशी सुविधाच दिली गेलेली नसते. उपनगरामध्ये आणि त्यातही ईशान्य मुंबईत मोठमोठ्या ट्रक्सच्या पार्किंगचीही समस्या भेडसावत आहे. जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त रस्ता गाड्यांच्या पार्किंगमुळे अडवला जातो. आणि पन्नास टक्के रस्ताच रहदारीसाठी उपलब्ध असतो.

ईशान्य मुंबईत या सर्व सुविधांना अजूनही वाव आहे. जागा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने सुनियोजित आणि उत्तम विकास होऊ शकतो. यासाठी या क्षेत्रातील तज्ञांशी चर्चा करून लोकप्रतिनिधीसुद्धा महापालिकेला विकासाचा आग्रह धरू शकतात. माझी सर्व लोकप्रतिनिधींना विनंती आहे की त्यांनी ईशान्य मुंबईच्या सुनियोजित विकासासाठी विशेष पुढाकार घ्यावा. आणि उपलब्ध जागेला विकासाचा न्याय द्यावा.

# ईशान्य मुंबईतील नीटनेटके उपनगरे

**कांताराम सोनवणे**

मुंबईला काही उपनगरे लाभली आहेत. त्यामुळे मुंबईचे सौंदर्य निश्चितच वाढले. पश्चिम उपनगरात अंधेरी, सांताक्रुझ, पार्ला ही तीन उपनगरे शहराचे सौंदर्य वाढवतात. तर पूर्व उपनगरात घाटकोपर, विक्रोळी आणि भांडुपचा पूर्व भाग, तसेच मुलुंड ही उपनगरे काहीशी नीटनेटकेपणाने सुशोभित वाटतात. मात्र कुर्ला, कांजुरमार्ग, भांडूप, घाटकोपर यातला पश्चिमेकडचा भाग काही अंशी बकाल तर सिमेंटच्या जंगलांनी गजबजलेला आहे. कुठेही बगिचे किंवा मोकळी मैदाने फारशी दिसत नाहीत. ईशान्य मुंबईचा विचार करताना चेंबूरला स्टेशन परिसरातला भाग किंवा ज्या परिसरात आर के स्टुडिओ होता तो भाग झाडांनी आणि बगिचांनी बऱ्यापैकी सजलेला आहे. परंतु या उपनगराला प्रदूषणाचे ग्रहण असल्याने तिथले रहिवासी नेहमीच अस्वस्थ असतात. ईशान्य मुंबईतल्या या उपनगरांच्या शृंखलेत शेवटचे टोक म्हणजे मुलुंड पूर्व एक नीटनेटके वसलेले उपनगर.मुलुंड पश्चिमेला गर्दी आणि दाटीवाटीने ग्रासले आहे. तर त्यामानाने मुलुंड पूर्वेचा भाग स्वच्छ सुंदर रस्ते आणि शांत परिसराने नटलेला वाटतो. त्या भागातल्या अनेक सोसायट्यांच्या परिसरात स्वतःची छोटी बाग असतेच. याशिवाय संभाजी मैदान आणि इतर तीन मोठ्या बागांचे वरदान मिळालेले आहे. चिंतामणराव देशमुख उद्यान हे तर प्रेक्षणीय तर आहेच. आणि आता सुरु असलेल्या



संभाजी मैदानाचे सुशोभिकरणही मुलुंडकरांना दिलासा देणारे ठरेल. मात्र त्या मैदानात यापेक्षा अधिक सिमेंट कॉंक्रि टचे बांधकाम होऊ नये. माती असलेले अधिकाधिक मोकळे मैदान पर्यावरणाच्या दृष्टीनेसुध्दा आवश्यक ठरते. ईशान्य मुंबईतल्या अन्य उपनगरांच्या तुलनेत मुलुंड उपनगरात प्रदूषणाचे प्रमाण कमी आहे. स्वच्छतेमुळे या परिसरात आजार किंवा व्याधी होण्याचे प्रकारही कमी असल्याचे एका सहज निरीक्षणातून लक्षात येते. या भागामध्ये कनिष्ठ मध्यम वर्ग, मध्यम वर्ग, उच्च मध्यम वर्गाची जास्त संख्या आहे. शिवाय मुलुंड पूर्वेला असलेल्या शिक्षणविषयक सुविधासुध्दा उल्लेख करण्यासारख्या ठरतात. नावाजलेले केळकर वझे कॉलेज तर अतिशय छोट्या स्वरुपात सुरु झालेले आणि आता नावारुपाला आलेले वामनराव मुरंजन हे महाविद्यालय, लक्ष्मीबाई इंग्लीश मिडीयम स्कूल या सर्व शाळा विशेषत्वाने दहावी बारावीच्या परीक्षांमध्ये गुणवत्तेत गाजलेल्या पाहायला मिळतात. मुलुंड पश्चिमेच्या मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स शिवाय वाणी विद्यालय, पुरंदरे शाळेने आपला स्वतंत्र ठसा उमटवलेला दिसून येतो. अनेक स्वयंसेवी संस्था सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजन करताना दिसतात. मुलुंड पश्चिमेचे महाराष्ट्र सेवा संघ, पूर्वेचे मुलुंड सेवा संघ, संस्कार भारती, मराठा मंडळ यासारख्या संस्था त्यात आघाडीवर असतात.


या सर्व काही जमा बाजूंचा विचार करत असतानाच ईशान्य मुंबई तितकीच समस्याग्रस्तही वाटते. चेंबूरपासून ते ठाण्यापर्यंत पूर्व द्रूतगती मार्ग पसरलेला आहे. परंतु या परिसरामधली स्वच्छता आणि प्रदूषण चिंताजनक परिस्थितीत दिसून येते. चेंबुर, तुर्भे माहुल या परिसरातील नागरिकांनी आंदोलन करून प्रदूषणाच्या समस्येकडे लक्ष वेधले आहे.हा भाग दुर्लक्षित झाल्यासारखा वाटतो. या संपूर्ण दहा पंधरा किलोमीटरच्या महामार्गावर एकही स्वच्छतागृह नाही. एकही पेट्रोल पंप नाही. एकही पोलिस चौकी नाही. अशी विचित्र परिस्थिती पाहायला मिळते. या महामार्गावरची वाढती रहदारी लक्षात घेता अधिक दक्षतेची गरज वाटते.

मुलुंड उपनगराचा विचार करीत असताना मुलुंड पूर्वेला स्टेशनला लागून पार्किंगची मोठी समस्या आहे. ती नसल्यामुळे देशमुख गार्डनमध्ये येणाऱ्यांनाही त्रास सहन करावालागतो. विशेष म्हणजे मुलुंड पूर्वेच्या संपूर्ण क्षेत्रफळामध्येसुध्दा स्वच्छता गृहांची पुरेशी सोय नाही. शिवाय निलम नगर किंवा फायर ब्रिगेडचे ऑफिस, गवाणपाडा याला लागूनच ठाण्याचा आनंद नगर कोपरी भागसुरु होतो. त्यामध्ये येणाऱ्या आणि दोन्ही उपनगरांच्या सीमेसारखा वाटणारा कोपरी नालासुध्दा स्वच्छ केला जात नाही. दर वर्षी पावसाळ्यात या परिसरातील लोकांना नाल्यामुळे पाणी तुंबण्याची सतत भीती असते. मुलुंडपूर्वेसारखे नीटनेटका परिसर अधिक स्वच्छता ठेवून पार्किंग तसेच फेरीवाल्यांच्या समस्येतून मुक्त केले तर ईशान्य मुंबई मतदार संघाचे आकर्षण ठरू शकेल.

# कोकण किनारपट्टीसह मुंबईत हाय अलर्ट

**(पान १ वरून)** लागेल ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत भारताप्रमाणेच एका विशिष्ट टार्गेटवर आणि त्यातही कमीतकमी लष्करी किंवा नागरी नुकसान टाळून भारताचे नुकसान कसे होईल किंवा आम्ही या हल्ल्याचा तशाच प्रकारची पद्धत वापरून प्रतिकार करू शकतो, हे दाखवून देण्याचा उद्देश पाकिस्तान साध्य करण्याची शक्यता आहे. प्रतिकाराच्या वेगवेगळ्या शक्यतांमध्ये मोठी शहरे टार्गेट करून देशात अस्थिरता माजवणे किंवा मुंबईसारख्या आर्थिक राजधानीला टार्गेट करून भारताची नागरी आणि आर्थिकदृष्ट्या कोंडी करण्याचे धोरण पाकिस्तान अवलंबिण्याची शक्यता नाकारता येत नाही. २६/११ चा मुंबईवरचा हल्ला हा असाच पाकिस्तानच्या छुप्या युद्धाचा भाग होता. त्यावेळी एकट्या मुंबईवर हल्ला केल्याने संपूर्ण देश वेठीला धरला गेला होता. आता तशाच प्रकारची चाल खेळली जाऊ शकते. या पार्श्वभूमीवर मुंबई किंवा कोकण किनारपट्टी कशी सुरक्षित राहील किंवा शत्रूला कोणतीही संधी मिळणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

आतापर्यंतच्या अनुभवाप्रमाणे दहशतवाद्यांना किंवा पाकिस्तानला मुंबई हे टॉप टार्गेट वाटत आले आहे. अगदी १९९३ चे बॉम्बस्फोट आणि त्यासाठी कोकण किनारपट्टीने मुंबईत आलेले आरडीएक्स किंवा २६/११ चे दहा दहशतवादीसुद्धा गेट वे ऑफ इंडियासारख्या पश्चिमी किनारपट्टीचा उपयोग करून भारतात घुसले होते. एवढेच नव्हे, तर गेल्या वीस वर्षांत मुंबईत घडवलेले वेगवेगळे बॉम्बस्फोट या महानगराची अस्थिरता




वाढवणारे होते आणि त्याचे तितकेच मोठे आंतरराष्ट्रीय पडसादही उमटले होते.

भारताने बागलकोटवर केलेल्या हल्ल्यामुळे जवळजवळ ३००-३५० अतिरेकी मारले गेल्याचा कयास केला जात आहे. या हल्ल्याने पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाला चपराक बसली आहे. भारताने केलेल्या या हल्ल्याचा प्रतिकार अधिक मोठ्या प्रमाणावर कसा देता येईल, यासाठी पाकिस्तान निश्चितच प्रयत्न करणार. त्यामुळे पुढच्या आठवडाभरात पाकिस्तान पुरेशी तयारी करून निश्चितपणे काही ना काही कुरापत काढेल, हे भारताने गृहीत धरले पाहिजे. यासाठी मुंबईसारखी महानगरे पाकिस्तानच्या रडारवर आहेत. हे प्रामुख्याने सांगण्याचे कारण असे की भारताने आतापर्यंत झालेल्या हल्ल्यांचा कधी इतक्या तातडीने प्रतिकार केला नाही. केवळ इशारे देऊन वेळ मारून नेली गेली. त्याचा पुरेपूर गैरफायदा दहशतवाद्यांनी आणि पाकिस्तानने घेतला. त्याचाच परिणाम म्हणून मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये वेळोवेळी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची हिम्मत पाकिस्तानने केली. भारताकडे असलेल्या लांब सागरकिनारपट्टीचा गैरफायदा घेत या दहशतवाद्यांनी भारतात शिरून अनेक कारवाया वेळोवेळी केलेल्या दिसतात. भारताने केलेल्या या प्रतिकारात्मक हल्ल्यांनंतर पाकिस्तानचे यासंदर्भात नेमके धोरण काय राहील, याकडे भारताचे लक्ष आहेच. त्याचीच पूर्वतयारी म्हणून कोकण किनारपट्टीसह मुंबईतील सुरक्षा व्यवस्था कडेकोट केली आहे.

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक - सखाराम भा. नाईक, यांनी सोमानी प्रिंटींग प्रेस, गाला नं.३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं.२, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३ येथे छापून विघ्नहर्ता सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., ९/बी ५, तारासिंग वाचनालयाजवळ, म्हाडा कॉलनी, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१ येथे प्रकाशित केले. संपादक - लक्ष्मीकांत गोविंद जोशी. कोकण विभागीय संपादक - समीर सुतार, मानद सहसंपादक - विनायक सुतार (या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) •RNI No. MAHMAR/2013/54958 • email : lokmarg@gmail.com • संपर्क - ९८२०७७९५५८

# सावरकरांच्या विकासविषयक संकल्पना आजच्या विकासविषयक दृष्टिकोनापेक्षा बहुआयामी

**लक्ष्मीकांत जोशी**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा २६ फेब्रुवारी हा आत्मार्पण दिन असतो. त्यांच्या मनातील विकास विषयक संकल्पना आजच्या विकास विषयक दृष्टीकोनापेक्षा किती बहुआयामी होत्या याचा परामर्ष यथोचित ठरू शकतो. पारतंत्र्यापासून स्वातंत्र्यापर्यंतचा प्रवास पाहिला तर देशाची प्रगती आणि विकास ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे लक्षात येते. अगदी ब्रिटीशांच्या काळातही त्या त्या वेळेचे समाजधुरीण आपल्या देशाला आणि समाजाला कशाची आवश्यकता आहे, कोणत्या साधानसुविधा उपयुक्त आहेत याचा विचार करीत असत. पारतंत्र्यात या विकासाला मर्यादा होत्या तरीदेखील स्वतःच्या देशाचा भविष्यकालीन वेध घेण्याचा प्रयत्न सावरकरांसारख्या स्वातंत्र्यवीराने केला होता. आपल्या आयुष्यातली जवळपास तेरा वर्षे बंदीवासात काढलेल्या सावरकरांच्या समाजाविषयीच्या काही मूलभूत संकल्पना होत्या ज्या आजच्या काळातही तितक्याच प्रकर्षाने लक्षात येतात. मग त्यामध्ये भाषाशुद्धीपासून ते आधुनिक शस्त्रांच्या वापरापर्यंत त्यांनी अनेक प्रकारच्या सूचना केल्याचे वाचायला मिळते. विकास म्हणजे केवळ भौतिक साधनसुविधांची उपलब्धता एवढाच त्याचा अर्थ होत नाही. तर समाजाला सर्वार्थाने साक्षर करणे, किंवा ज्या चुकीच्या गोष्टी आहेत त्या काढून टाकणे, अनावश्यक रूढी परंपरांना नाकारणे किंवा योग्य त्या गोष्टींचा आग्रह धरून त्याचा प्रचार आणि प्रसार करणे हासुद्धा विकासाचा एक भाग असतो. आपण जेव्हा सावरकरांच्या विकासाच्या संकल्पनांचा विचार करतो त्यावेळी सर्व बाजूंनी देश आणि समाज सशक्त झाला पाहिजे. सावरकरांच्या काळात समाजच दुभंगलेला आणि विभागलेला होता. इंग्रज हे शस्त्र आणि शास्त्रसंपन्न असल्याने आपल्या देशालाही शस्त्र आणि शास्त्रसंपन्न व्हावे लागेल असा अतिशय मूलभूत विचार त्यांनी मांडला होता. म्हणूनच १९३८ साली भरलेल्या साहित्य संमेलनात त्यांनी लेखकांनासुद्धा लेखण्या मोडा, शस्त्रे हाती घ्या, अशा प्रकारची त्या काळाला लागू पडेल अशी सूचना केली होती. हे सांगण्याचे धाडस सावरकर करू शकले कारण विचार मांडताना तो श्रुतीत उतरविण्याचे बळ त्यांच्याकडे होते. त्यांनी केलेली प्रत्येक कृती ही ठोस विचारांवर आधारित होती. म्हणूनच ते अंदमानसारखी कठोर शिक्षा भोगू शकले किंवा मार्सेलिसच्या समुद्रात उडी मारून आपल्या देशाचा स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कशाप्रकारच्या कष्टांची जरूरी आहे हे त्यांनी दाखवून दिले. **(पान १० वर)**



**भारताने स्वातंत्र्यानंतर अणुबॉंब बनवावा, विविध प्रकारचे आधुनिक शस्त्र संपादन करून आपली ताकद वाढवावी. जगामध्ये जो देश बलसंपन्न असतो तोच स्वतःचा विकास करू शकतो. तेव्हा जगाला त्याचेच मूल्य समजत असते. त्याकाळातला सावरकरांचा हा विचार देशाच्या विकासाची मूलभूत संकल्पना मांडणारा होता.**




जयोस्तुते जयोस्तुते
श्री महन्ममंगले शिवास्पदे
शुभदे स्वतंत्रे भगवती
त्वामहं यशोयुताम् वन्दे

ईशान्य मुंबई विकास पुरवणीस शुभेच्छा आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांना आत्मार्पण दिनी विनम्र अभिवादन



श्री. प्रकाश गंगाधरे
नगरसेवक



ईशान्य मुंबई विकास पुरवणीस शुभेच्छा आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांना आत्मार्पण दिनी विनम्र अभिवादन



श्री. मनोज कोटक
नगरसेवक आणि महापालिका भाजपा गटनेते

# सावरकरांच्या विकासविषयक संकल्पना आजच्या विकासविषयक दृष्टिकोनापेक्षा बहुआयामी

(पान ९ वरून)

भारताने स्वातंत्र्यानंतर अणुबॉब बनवावा, विविध प्रकारचे आधुनिक शस्त्र संपादन करून आपली ताकद वाढवावी. जगामध्ये जो देश बलसंपन्न असतो तोच स्वतःचा विकास करू शकतो. तेव्हा जगाला त्याचेच मूल्य समजत असते. त्याकाळातला सावरकरांचा हा विचार देशाच्या विकासाची मूलभूत संकल्पना मांडणारा होता. अर्थातच शस्त्र किंवा शास्त्र या गोष्टी अचानकपणे निर्माण होत नाहीत, त्यासाठी समाजाने साक्षर असले पाहिजे. जगाच्या विविध भागामध्ये काय काय सुरू आहे याचे आकलन समाजाला सतत झाले पाहिजे. म्हणून त्यांनी त्या काळामध्ये शिक्षण प्रसार किंवा ग्रंथालयांची निर्मिती यालाही तितकेच महत्त्व दिले होते. अंदमानहून सुटल्यानंतर ते रत्नागिरीत स्थानबद्ध होते. परंतु तिथेही त्यांनी आपली ही विकास संकल्पना मांडली होती. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी रत्नागिरीत केलेले कार्य हे सामाजिक विकासाचा सर्वात मोठा पैलू होता ज्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही स्तुती केली होती. कारण राष्ट्रविकासाच्या संकल्पनेमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक तीनही अंगांचा समावेश होतो. राजकीय विकासाबाबत ते कमालीचे आग्रही होते. आजच्या राजकारणामध्ये सत्तेला महत्त्व प्राप्त झाले आहे. पण जी सत्ता या देशातून जो खरा भूमिपुत्र आहे म्हणजेच प्राचीन काळापासून जो समाज या देशाचा वारस आहे त्याच्या संघटितपणावर या देशाचा राजकीय विकास अवलंबून आहे ते सावरकरांनी ओळखले होते. आणि

**१९३८ साली भरलेल्या साहित्य संमेलनात त्यांनी लेखकांनासुद्धा लेखण्या मोडा, शस्त्रे हाती घ्या, अशा प्रकारची त्या काळाला लागू पडेल अशी सूचना केली होती. हे सांगण्याचे धाडस सावरकर करू शकले कारण विचार मांडताना तो श्रुतीत उतरविण्याचे बळ त्यांच्याकडे होते. त्यांनी केलेली प्रत्येक कृती ही ठोस विचारांवर आधारित होती.**

म्हणूनच सावरकरांनी हिंदू समाजाला मतभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन तर केले होते. शिवाय भाषाशुद्धीसारखा आणि स्वदेशीसारखा विचार मांडून त्यांनी विकास हा समाजाची मानसिकता जोपासणारा असला पाहिजे हेसुद्धा त्यांनी विविध उपक्रम मांमधून दाखवून दिले. पुण्याला एका कार्यक्रमात त्यांनी ज्या महानगराचा प्रमुख कोणत्या नावाने ओळखला जावा याचेही विवेचन केले आणि अशा महानगर प्रमुखासाठी महापौर हा शब्द योग्य ठरतो अशी महत्त्वाची सूचना केली जी आजही वापरात आहे. योग्य शब्दांची योजना ही त्या व्यवस्थेचा विकास घडविते. अशी सावरकरांची सूक्ष्म दृष्टी पाहिल्यानंतर त्यांची विकासाची संकल्पना कशी बहुआयामी होती हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

आपल्याला स्वातंत्र्य मिळणार आहे पण ते स्वातंत्र्य आपण कसे अंमलात आणले पाहिजे याचा त्यांनी त्याचवेळी विचार केला होता. म्हणूनच शस्त्र आणि शास्त्र या दोन्ही आघाड्यांवर प्रयत्न करीत असताना सामान्य माणूस सर्व रीतीने सशक्त होईल अशा योजनांचा आग्रह त्यांनी धरला होता. अशा शब्दात त्यांनी विकासाचे चिंतन केल्याचे पाहायला मिळते.

अगदी टोकाला जाऊन असे म्हणावेसे वाटते की आज सावरकर असते तर पाकिस्तान इतके धाडस करूच शकला नसता. किंबहुना काश्मीरची समस्या कधीच निकालात निघाली असती. अखंड भारताचा त्यांनी धरलेला आग्रह हा असाच भारताच्या भौगलिक विकासाचे महत्त्व जपणारा होता. आजच्या संदर्भात सावरकरांच्या या विचारांचे अतिशय बारीक बारीक मुद्यांमध्ये जर विश्लेषण केले तर सशक्त भारताचा सर्वंकष आराखडा सहजपणे आकाराला येऊ शकतो. दुर्दैवाने सावरकरांच्या या विचार संचिताकडे अक्षम्य दुर्लक्ष केले गेले आहे.

# मुंबईतील बालमृत्यूंमध्ये वाढते प्रमाण

**(पान १ वरून)** उपलब्ध करून दिली पाहिजे.

**नागरी सुविधांचाही अभाव**

खरे तर ही आकडेवारी एका मोठ्या अभ्यासाचा विषय ठरते. उदाहरणार्थ सायनच्या टिळक रुग्णालयात सर्वाधिक बालरुग्ण येत असतील तर ती कोणत्या परिसरातून येतात. त्या रुग्णांच्या पालकांची आर्थिक स्थिती काय असते. त्यांच्यापर्यंत सरकारी योजना पोहोचल्या आहेत का, हे बालरु ग्ण ज्या परिसरातून येतात तिथली स्वच्छता किंवा त्यांना मिळणाऱ्या नागरी सुविधा काय दर्जाच्या आहेत, हेसुद्धा तपासले गेले पाहिजे. याचा अर्थ ज्या परिसरातून सर्वाधिक बालरुग्ण येतात तिथली स्वच्छता किंवा नागरी सुविधा चांगल्या दर्जाच्या नाहीत हे स्पष्ट होते. म्हणूनच बालरुग्णांची ही संख्या लक्षात घेताना त्या त्या भागातील स्वच्छता किंवा सुविधांचाही मुद्दा तितक्याच गांभिर्याने लक्षात घ्यावा लागेल.

यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने संबंधित विभाग कार्यालयाशी समन्वय साधून नागरी सुविधांचा प्रश्नही लक्षात आणून दिला पाहिजे. अर्थात बालमृत्यूंचे प्रमाण राज्यातल्या इतर भागातही बरेच मोठे आहे. गेल्या दोन वर्षांत नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात पाचशेपेक्षा जास्त मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते.

ठाणे जिल्हा रुग्णालयातही काहीशी हीच परिस्थिती आहे. आदिवासी भागातून येणारे नवजात शिशू कुपोषणाचे बळी ठरतात. या आदिवासी भागात पुरेसा पोषण आहार उपलब्ध होत नाही. तिथेसुद्धा सरकारी योजना अस्तित्वात असताना त्या आदिवासींपर्यंत पोहोचत नाहीत. एकीकडे आर्थिक स्थिती बिकट असलेला समाजातला बराच मोठा वर्ग योग्य त्या पोषक आहारापासून वंचित राहतो किंवा किमान आवश्यक असलेल्या नागरीसुविधाही तो मिळवू शकत नाही. नागरी आणि आरोग्य सुविधांचा अभाव हेच या बालमृत्यूचे कारण म्हणावे लागेल.

सरकारी योजनांचा भडीमार होत असताना किंवा अत्याधुनिक उपचार उपलब्ध होत असताना बालमृत्यू कमी होण्याऐवजी ते कसे काय वाढतात हे मोठेच गूढ ठरते. अन्य देशांमध्ये सामाजिक आरोग्याला फार महत्त्वाचे स्थान दिले जाते. एकीकडे या आधुनिक आरोग्य सुविधांमुळे नागरिकांचे आयुष्य वाढत असताना भारतासारख्या देशात बालमृत्यूचे प्रमाण वाढावे, यातला विरोधाभास इतका धक्कादायक आहे की त्याची अतिशय गांभिर्याने दखल घेतली पाहिजे.

‘लोकमार्ग’च्या
विकास विशेषांकास
हार्दिक शुभेच्छा
- ॲड. हर्षद देसाई



बी २४, एकता को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.,
संतोषीमाता मंदिरसमोर, लालबहादूर शास्त्री मार्ग,
मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०
**संपर्क : २१६४ ४०१८ / ९८२०१ २२१०८**



## आर सिटी आर्ट फेस्टिवल २०१९ मध्ये अभिनेता कार्तिक आर्यन, अभिनेत्री कीर्ति सेनन पोहचले

१५ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी २०१९ दरम्यान चालणाऱ्या आर सिटी आर्ट फेस्टिव्ल मध्ये अभिनेता कार्तिक आर्यन, अभिनेत्री कीर्ति सेनन यांनी मज्जा-मस्ती करत प्रेक्षकांची मने जिंकली, काही दिवसात प्रदर्शित होणारा 'लुकाछिपी' चित्रपटातील एका गाण्यावर नृत्य करत त्यांनी इतरांनाही त्यावर थिरकायला भाग पाडले. या दरम्यान तरुण मंडळांनी त्यांच्या नावाचा जल्लोष केला. मग कलाकारही प्रेक्षकांबरोबर सेल्फी घेतल्याशिवाय राहिले नाहीत. या प्रसंगी राजीव मल्ला, सीईओ मॉल, संतोष पांडे , हेड आर सिटी मॉल उपस्थित होते.

# मुलुंड पूर्व चेकनाक्याचा प्रश्न अधांतरी

**मुंबई / प्रतिनिधी**

**वस्तुसेवा कर लागू करून दोन वर्षाचा कालावधी होत आला आहे. या करामुळे मुंबईतली प्रमुख जकात नाकी बंद झाली. मुलुंड पूर्वेला असलेल्या जकात नाक्याची प्रचंड जागेचे नेमके काय करायचे याबाबतमहापालिका अजूनही निश्चित निर्णय घेऊ शकलेली नाही.**

**या जागेचा वापर परवडणाऱ्या घरांसाठी केला जावा. असाप्रयत्न बिल्डर लॉबीकडून होत आहे तर अवजड वाहनांच्या पार्कि ग करीता ही जागा उपयोगात आणून महापालिकेला उत्पन्न मिळवता येईल अशीदेखीलसूचना पुढे आली आहे. परंतु ज्या उपनगरामध्ये हा मुलुंड चेकनाका येतो त्याठिकाणी असलेली ही प्रचंड मोठी जागा या उपनगराच्या सौंदर्यात भर घालणारी असावी. अशी मागणी येथील महानगर विकास परिषदेने केली आहे. परंतु सध्या स्थानिक लोकप्रतिनिधी या जागेच्या व्यापारी उपयोगावर जास्त भर देत असून बिल्डरांचा एक मोठा गटही ही मोक्याची जागा आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करीत आहे. या वर्षीच्या महापालिकेच्या अंदाजपत्रकात मुलुंड चेकनाक्याच्या रिकाम्या जागेचा उपयोग करण्याचा ओझरता उल्लेख झालेला आहे. परंतु अजूनही महापालिकेने निश्चित निर्णय घेतलेला नाही.**

**विशेष म्हणजे मुलुंड ते घाटकोपर हा पूर्व द्रूतगती मार्ग म्हणजे मुंबई महानगराचे प्रवेशद्वार ठरते. मुलुंड उपनगराच्या दृष्टीने या जागेचा उपयोग उपनगराचे तसेच महानगराचे सौंदर्य वाढवण्यासाठी करता येऊ शकता. परवडणाऱ्या घरांसाठी सरकारने मिठागरांच्या काही जमीनी उपयोगात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मत महानगर विकास परिषदेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ वास्तुतज्ज्ञ दिलीप देशमुख यांनी व्यक्त केले आहे. विकासाच्या दृष्टीकोनातून पर्यावरण ,स्वच्छता आणि सौंदर्य या गोष्टींनाही तितकेच महत्व दिले गेले पाहिजे.**

# आता मुलुंड-भांडुपमध्ये फ्लेमिंगो सफारीचा आनंद

## स्थानिक भूमिपूत्रांना रोजगाराची संधी

**मुंबई/विशेष प्रतिनिधी**

मुलुंड-भांडुपच्या खाडी किनाऱ्यालगत कांदळवनाची असलेली दाटी त्याला न्यायालयाने दिलेला संवेदनशीलतेचा दर्जा यातून हे वन संरक्षित केले. न्हावा-शेवा, शिवडीसारख्ख्या खाडी किनारी हिवाळ्यात येणारे स्थलांतरित परदेशी पक्षी फ्लेमिंगो मुबलक अन्न मिळू लागल्याने ते येथेचे स्थायिक झाल्याने ठाणे ते मुंबईचा हा खाडी किनारा या पक्ष्यांसाठी संरक्षित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे याच फ्लेमिंगोंच्या वसतिस्थानाला अभयारण्याचा दर्जा देण्यात आल्याने ठाणे-ऐरोली-मुलुंड-भांडुपचा खाडी किनारा आता फ्लेमिंगो अभयारण्य म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. वनखात्याने पक्षीप्रेमी आणि पर्यटकांना याकडे आकर्षित करण्यासाठी ऐरोलीमध्ये फ्लेमिंगो सफारी सुरू केली. त्याच धर्तीवर भांडुप-मुलुंड आणि ऐरोली अशी फ्लेमिंगो सफारी सुरू करण्याचाही वनखात्याचा प्रस्ताव आहे.

अभयारण्याच्या या प्रस्तावास वनखात्याच्या विभागीय स्तरावरून हिरवा कंदील मिळायचा बाकी आहे. येत्या काही दिवसात हा प्रस्ताव मंजूर झाल्यास मुंबईकर आणि निसर्गप्रेमीसाठी ती पर्वणी ठरण्याची शक्यता आहे. याबाबतची माहिती ठाणे खाडी-फ्लेमिंगो अभयारण्याचे वनक्षेत्रपाल मयूर बोठे यांनी लोकमार्गशी बोलताना दिली.



ऐरोली येथे किनारी व सागरी जैवविविधता केंद्र राज्यात प्रथमच ऐरोलीमध्ये सुरू करण्यात आले. या केंद्रात मोठ्या संख्येने पर्यटक येत असल्याची माहिती बोठे यांनी दिली. फ्लेमिंगो सफारीसाठी येणाऱ्या पर्यटकांना फ्लेमिंगो सफर केल्यानंतर त्यांना किनारी व सागरी जैवविविधता केंद्र दाखवले जाते. मुलुंड-भांडुपला सागरी किनारा आणि कांदळवनाचे मोठे क्षेत्र असल्याने या परिसरात खाडीकडील सपाट, पाणथळ परिसरात विविध प्रकारचे जलचर तसेच मासे, खेकडे, पाणघोणस, बहुविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. तसेच बुलबुल पक्षी, पाणकोंबळ्या आणि असंख्य प्रकारचे जीवजंतू आढळतात.

भांडुप परिसरापासून सुरवात या पर्यटनाला सुरवात करून त्यांना ऐरोलीचे केंद्र दाखवल्यानंतर पुन्हा या पर्यटकांना भांडुप येथे सोडण्याची योजना आहे.

मुलुंड-भांडुपमधील भूमिपुत्र-कोळी बांधव पहिल्यापासून खाडीमध्ये परंपरागत मासेमारी करत आले आहेत. त्यातील निवडक लोकांना परवानग्या देऊन त्यांच्या सहभागाने एक समिती स्थापन केली जाणार आहे. त्यांच्या बोटी येथे पर्यटनासाठी वापरल्या जाणार आहेत. त्यासाठी नियमावली तयार केली जाणार आहे. मात्र हे सगळे या प्रस्तावाला मंजूरी मिळाल्यानंतर अस्तित्वात येईल असेही बोठे यांनी लोकमार्गशी बोलताना सांगितले. मात्र यातून स्थानिक ८-१० जणांसाठी रोजगार निर्मिती होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



**नळपाडा आणि घाटीपाडा रोड येथे रस्ता दुरुस्ती कामाचा शुभारंभ करण्यात आला, यावेळी नगरसेवक मनोज कोटक यांच्यासह उपस्थित पदाधिकारी आणि नागरीक.**










# M/s. Vitthal Group

Interior | Contsruction | Infrastructure

Service Through Quality

Office No. + 022 - 2567 0668 /
022 - 2591 3815 /

Office Address :
B - 301, Shree Swami Samarth Bhavan,
Junction of Dr. R. P. Road &
D.G. Road, Mulund (West),
Mumbai - 400 080.

Email I.D. :
shreevitthalgroup@gmail.com

**We create Happy Environment for Home's & Office's and Shape Interior Spaces. In collaboration with our client, we create luxurious interiors. We have 30 years experience. Our design's blends with tradional and modern concepts.**